


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २१.११.२०२४ | अंक नं. २२० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020







# शहरातील संघटित टोळीविरुद्ध 'मोक्का' अंतर्गत कारवाई करावी

## महाविकास आघाडीची पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - अहिल्यानगर शहरातील संघटित टोळी मयूर राऊत, सनी कांबळे या सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित प्रतिबंधक कायदा (मोक्का) अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, सदर संघटित टोळीने बोल्हेगाव येथे मतदान केंद्रासमोर २० नोव्हेंबर रोजी उमेश भांबरकर याच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. २१ नोव्हेंबरला सदर संघटित गुंडांच्या टोळीने ओंकार शेळके याच्यावर लोखंडी पाईप रॉडने प्राणघातक हल्ला केला आहे. सदर प्राणघातक हल्ला मयूर राऊत, सनी कांबळे व इतर संघटित टोळीने केलेला आहे. सदर आरोपी खोटी अ‍ॅट्रॉसिटी केस करण्याची धमकी देत आहेत. तरी राऊत, कांबळे या संघटित गुंडांच्या टोळीविरुद्ध अतिजलद महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का) अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदर आरोपी पोलिस अधीक्षक कार्यालयातील तोडफोड प्रकरणातील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध शहरातील विविध पोलिस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत. शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहर भयमुक्त करण्यासाठी या गुंडांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, युवा सेनेचे विक्रम राठोड, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दिलीप सातपुते, निलेश मालपाणी, अशोक दहिफळे, दत्ता जाधव आदी उपस्थित होते.



शहरातील संघटित टोळीविरुद्ध मोक्काअंतर्गत कारवाई करावी या मागणीचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे देताना महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर, संभाजी कदम, विक्रम राठोड, बाळासाहेब बोराटे, दिलीप सातपुते, निलेश मालपाणी, अशोक दहिफळे, दत्ता जाधव आदी.

# खासदार निलेश लंके, अभिषेक कळमकर यांचे स्टेट्स ठेवल्याने तिघांकडून एकास बेदम मारहाण

नगर - खा. निलेश लंके व महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांचे फोटो असलेले स्टेट्स मोबाईलमध्ये ठेवल्याने शहरातील एका तरुणाला तिघांनी बेदम मारहाण करत पोलिस ठाण्यात तक्रार केली तर अ‍ॅट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याची घटना गुरुवारी (दि.२०) दुपारी घडली.

ओंकार शेळके (रा. काटवन खंडोबा) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून त्याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शेळके हा कोतवाली पोलिस स्टेशनच्या मागील बाजूच्या गल्लीत मेडिकल दुकानात कामाला असून तो काम करत असताना तेथे दुपारी ५ जण आले. त्यातील तिघांनी त्याला 'तू खा. निलेश लंके, अभिषेक कळमकर यांचे स्टेट्स का ठेवतो, संग्राम भैय्यांचे का नाही' असे म्हणत त्यास लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच जाताना तू जर आमची पोलिसांकडे तक्रार केली तर तुझ्यावर अ‍ॅट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करू, तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली असल्याचे जखमी ओंकार शेळके याने सांगितले.

मारहाणीत जखमी शेळके यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केल्याचे समजल्यावर अभिषेक कळमकर, युवा सेनेचे विक्रम राठोड, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, दिलीप सातपुते यांच्यासह महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयात धाव घेत शेळके याच्या प्रकृतीची विचारपूस केली. मारहाण करणारे सर्वजण आ.संग्राम जगताप यांचे कार्यकर्ते होते असा आरोप महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

जखमी शेळके याच्या तोंडाला मार लागलेला असल्याने त्याला बोलताना त्रास होत होता. त्यामुळे पोलिसांकडून त्याचा जबाब नोंदवून घेण्याचे काम दुपारी उशिरापर्यंत सुरु होते.



स्टेटस ठेवले म्हणून तिघांनी केलेल्या बेदम मारहाणीत जखमी झालेल्या ओंकार शेळकेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. (छाया- धनेश कटारिया)






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## मैं अकेला अपनी धून में मगन...

सोशल मीडियाच्या गदारोळात, दुनिया मुठ्ठी में च्या झंझावातात माणूस जगाची माहिती तर घेऊ शकतो पण आजकाल हाच माणूस एकटा पडत चाललाय. आभासी संवाद वाढलाय पण हृदयस्थ सुसंवाद विरळ होत चाललाय. दोन पिढीतले अंतर झपाट्याने वाढलेय. परिणाम... वाढते एकाकीपण...

एकाकीपण म्हटलं तर चांगलंही पण स्वतःशी हितगुज, सुसंवाद साधता येत नसेल तर शापही! एकाकीपण हे जीवनातले अटळ सत्य तर आहेच पण त्यापेक्षा माणसाची ती एक महत्त्वाची गरजही आहे. एकाकी अवस्थेतच आपल्याला आपली खरी ओळख पटते. यामुळेच की काय सर्व साधुसंतांनी, अध्यात्म साधकांनी, तत्त्वज्ञांनी एकांताचे महत्त्व सांगितलं आहे.

'सुखालागि आरण्य सेवीत जावे'. रामदासांइतका जनतासंपर्क कुणी साधला आहे? पण त्यातही त्यांनी आपले अलिप्त एकाकीपण कसोशीने जपले होते. म्हणूनच ते





स्वतःचे वर्णन करतांना म्हणतात,

'दास डोंगरी राहतो । यात्रा देवाची पाहतो ।।

जगद्गुरु तुकाराम म्हणतात,

येणे सुख घडे एकांताचा वास । नाही गुणदोष येत अंगा ।।
तुका म्हणे होय मनाशी संवाद । आपुलाचि वाद आपणासी ।।

स्वतःशी सुसंवाद साधू शकणाऱ्या साधकाचे आयुष्य समृद्ध होऊ शकते. अनुभूती येण्याअगोदर आपण एकांताला, एकाकीपणाला भीतो पण त्यानंतर आपण एकाकीपणात रमू शकतो. एकांताची सुखे मनःपूर्वक अनुभव शकतो. देवानंदवर चित्रीत केलेल्या किशोरदाच्या गाण्याप्रमाणे ''मैं अकेला अपनी धून में मगन, जिंदगीका मजा लिए जा रहा हूँ''...




# नगर जिल्ह्यात २ वेगवेगळ्या अपघातात ५ मतदारांचा मृत्यू

### १ गंभीर जखमी, मतदानासाठी येणाऱ्या दोघांचा आणि मतदान करून चाललेल्या तिघांचा समावेश

नगर – जिल्ह्यात २ वेगवेगळ्या अपघातात ५ मतदारांचा झाला दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यातील दोघे पितापुत्र पुण्याहून राहुरी कडे मतदानासाठी जात होते. त्यांचा नगर पुणे रोडवर सुपा परिसरात अपघात झाला. तर चौघे मतदान करून अकोलेहून सिन्नर कडे जाण्यासाठी देवठाण गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभे असताना मालवाहू पिक अप गाडीने त्यांना धडक दिली. त्यात तिघांचा मृत्यू तर १ महिला गंभीर जखमी झाली आहे.

राहुरी शहरातील कासार समाजातील कामानिमित्त सध्या पुणे येथे कार्यरत असलेले मनोज हरिभाऊ रासने (वय ४६) व त्यांचा मुलगा सुजल मनोज रासने (वय २१) या पिता–पुत्राचा सुपा येथे झालेल्या दुचाकीच्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. मंगळवारी (दि.१९) पुण्याहून मनोज रासने व मुलगा सुजल हे मतदानासाठी राहुरीकडे येत असताना सायंकाळी ७ वाजता सुपा परिसरात त्यांच्या दुचाकीचा अपघात होऊन रासने हे जागीच ठार झाले.

तर मुलगा सुजलला स्थानिकांनी गंभीर अवस्थेत सुपा येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सुजलच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने व जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचीही प्राणज्योत मालवली. बुधवारी (दि.२०) सायंकाळी शवविच्छेदनानंतर दोन्ही पिता–पुत्रांवर राहुरी येथील गणपती घाट स्मशानभुमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मनोज रासने यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा आहे.

### पिकअपच्या धडकेत तिघांचा मृत्यू तर महिला जखमी

मोटारसायकल व पिकअपच्या झालेल्या भीषण अपघातात तीनजण ठार तर एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना देवठाण–सिन्नर रस्त्यावर बुधवारी (दि.२०) सायंकाळी घडली. मृतांमध्ये धुमाळवाडी व पिंपळगाव नाकविंदा येथील तरुणांचा समावेश आहे. अकोले विधानसभा मतदारसंघ निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावून गणेश भिकाजी झोळेकर, सर्वेश संतोष झोळेकर, अनिकेत सुभाष लगड व ज्योती सुभाष झोळेकर हे सिन्नरच्या दिशेने चालले होते. त्यावेळी देवठाण (ता.अकोले) गावाजवळील गायकवाड वस्तीजवळ हे सर्वजण रस्त्याच्या कडेला उभे असताना भरधाव आलेल्या एका मालवाहू पिकअपने या चौघांना जोराची धडक दिली.

पिकअप गाडीची धडक जोराची बसल्याने गणेश झोळेकर, सर्वेश झोळेकर व अनिकेत लगड या तिघांचा जागीच मृत्यू झाला. स्थानिकांनी सर्वांना तत्काळ अकोले ग्रामीण रुग्णालयात हलविले. मात्र वैद्यकीय अधिकार्यांनी तिघांनाही मृत घोषित केले. ज्योती झोळेकर या महिलेची प्रकृती चिंताजनक असून तिच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताचे वृत्त समजताच रुग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. या अपघातातील मृत पावलेले तरुण अत्यंत गरीब कुटुंबातील असल्याचे समजते. त्यांच्या अपघाती निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# विधानसभा निवडणुकीतही उडाला पुन्हा तोच गोंधळ !

### निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर; प्रशासनाने सुधारणा करणे आवश्यक


नगर – राज्यात काही ठिकाणच्या किरकोळ घटना वगळता यंदाची विधानसभा निवडणूक तशी व्यवस्थित पार पडली. ४१३६ उमेदवारांचे भवितव्य मशीनबंद झाले. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, आध्यात्मिक संस्था, संप्रदाय, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, मतदारांना मतदानासाठी फार लांब जावे लागू नये म्हणून यंदा मतदान केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली होती. सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. देशातील महनीय व्यक्तींच्या फोन कॉलसह बस स्टॅन्ड, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी अनाउन्समेंट करून लोकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले; मतदारांना करण्यात आलेले धार्मिक आवाहन हें यंदाच्या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. लोकसभेच्या तुलनेत मुंबईतील मतदानाचा टक्का वाढला असला तरी ज्या प्रमाणात जनप्रबोधन झाले होते त्या तुलनेने वाढलेली टक्केवारी अगदीच नगण्य आहे.

मतदारांतील निरुत्साह यंदा पुन्हा दिसला. असे असले तरी यंदा उत्साही मतदारांची ठिकठिकाणी घोर निराशा झाल्याचे चित्रही अनेक ठिकाणी दिसले. कितीतरी मतदारांची नावे त्यावेळेसही मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घरे भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी लोकसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? लोकसभा निवडणुका झाल्यानंतर विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता.

या काळात याद्या अध्यवत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला. या गोंधळाला उत्तरदायी असणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणीही केली जात आहे. निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही मतदारांची नावे यंदा नेहमीच्या मतदान केंद्रात न येता भलत्याच मतदान केंद्रांना जोडली गेल्याने त्यांना विनाकारण धावपळ करावी लागत होती. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

राज्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायाला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

## मनसुखलाल मुनोत यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पुणे येथील रहिवासी मनसुखलाल चांदमल मुनोत (वय ८९) यांचे २१ नोव्हेंबर रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यसंस्कार वैकुंठधाम पुणे करण्यात आला.

त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे, २ भाऊ, बहिण असा परिवार आहे. अभय, महेंद्र यांचे ते वडील होत. अहमदनगर जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत (नेवासकर) व विलास मुनोत यांचे ते बंधु होत.

## देव पाटोना यांचे हृदयविकाराने निधन



भिंगार – महेशनगर येथील रहिवासी देव अनिल पाटोना (वय २७) यांचे २१ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, बहिण, १ भाऊ असा परिवार आहे.

## मंगलबाई पाठक यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील मंगलबाई प्रफुल्ल पाठक (वय ७१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या देहूरोड येथील 'आयुध निर्माणी'मधील (ऑर्डिनन्स फॅक्टरी) निवृत्त सरव्यवस्थापक प्रफुल्ल दत्तात्रय पाठक यांच्या पत्नी होत.



त्यांच्या मागे दोन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. 'एमआयडीसी' येथील 'व्हिजन इंजीनिअरिंग'चे संचालक भूषण भणगे यांच्या त्या सासू होत. त्यांच्या पार्थिवावर नगर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार झाले.

## कौसाबाई खांदवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सांडवा (ता.नगर) येथील रहिवासी कौसाबाई राधाकिसन खांदवे (वय ८०) यांचे २१ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## आशालता जरांगे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – वामनभाऊनगर (पाथर्डी) येथील रहिवासी आशालता यशवंत जरांगे (वय ७४) यांचे २० नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पाथर्डी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ भाऊ, भाऊजया, सुन, नातू असा परिवार आहे. सुहास जरांगे यांच्या त्या मातोश्री होत. पाथर्डी केमिस्ट्री असोसिएशनचे सुहास जरांगे यांच्या त्या मातोश्री होत.



# अहमदनगर मतदारसंघात अंदाजे ६३.८५ टक्के मतदान

### सर्वाधिक मतदान नेवासा मतदारसंघात तर सर्वात कमी मतदान नगर शहरात

नगर – विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (दि. २०) अहमदनगर शहरासह जिल्ह्यात किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान पार पडले. अहमदनगर शहर मतदारसंघात अंदाजे ६३.८५ टक्के मतदान झाले असून, मागील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदानाचा टक्का वाढला आहे. मागील विधानसभेसाठी सुमारे ५८ टक्के मतदान झाले होते तर नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मताचा टक्का वाढला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १२ मतदारसंघात मतदानाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. सर्वाधिक ७९.८० टक्के मतदान नेवासा मतदारसंघात झाले आहे तर सर्वात कमी मतदान अहमदनगर शहर मतदारसंघात ६३.८५ टक्के नोंदवले गेले आहे. सकाळच्या सत्रात मतदान कमी झाले होते. त्यानंतर दुपारी मतदानाला काहीसा वेग आला. दुपारी ३ वा. पर्यंत ४४ टक्के मतदान घडवून आले होते मात्र त्यानंतर तीन तासात जवळपास २० टक्के मतदान झाले असून, एकूण मतांची टक्केवारी ६३.८५ टक्क्यांवर पोहचली आहे. या मतदारसंघातील लढतही लक्षवेधी ठरत असून, महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप व महाआघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्यात सरळ लढत झाली आहे. या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून, शनिवारी (दि. २३) सकाळी प्रत्यक्ष मतमोजणी झाल्यानंतर अत्यंत रंजक ठरलेल्या या लढतीत कोण बाजी मारणार हे स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीत अनेक मुद्दे चर्चेत आले. सुरुवातीला एकतर्फी वाटणारी ही लढत प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मात्र रंगतदार ठरली आहे. त्यामुळे मतदारांना कोणते मुद्दे भावले आणि त्याचा मतदानावर प्रत्यक्ष कसा परिणाम झाला हे निकालातूनच स्पष्ट होणार आहे.

### जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात झालेल्या मतदानाची टक्केवारी

| मतदार संघ | अंदाजे टक्केवारी |
|---|---|
| अहमदनगर शहर – २२५ | ६३.८५% |
| अकोले – २१६ | ७१.९७% |
| कर्जत–जामखेड – २२७ | ७५.१५% |
| कोपरगाव – २१९ | ७१.४७% |
| नेवासा – २२१ | ७९.८९% |
| पारनेर – २२४ | ६६.२७% |
| राहुरी – २२३ | ७४.५०% |
| संगमनेर – २१७ | ७४.५७% |
| शेवगाव – २२२ | ६८.२१% |
| शिर्डी – २१८ | ७४.५२% |
| श्रीगोंदा – २२६ | ७२.२८% |
| श्रीरामपूर – २२० | ७०.१२% |

# लोकशाही संरक्षण न्यायाधिकरणाची स्थापनेचा प्रस्ताव; निवडून येणाऱ्या प्रत्येकास द्यावी लागणार संपत्तीची माहिती

### देशात लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी प्रयत्न; पीपल्स हेल्पलाईनचा ज्येष्ठ वकीलांच्या सहकार्याने पुढाकार

नगर – सत्तापेंढाऱ्यांच्या कुबेरशाहीमुळे लोकशाही धोक्यात आली असताना देशात लोकशाही संरक्षण कायदा २०२४ आणण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनने ज्येष्ठ वकीलांच्या सहकार्याने पुढाकार घेतला आहे. या कायद्याअंतर्गत जिल्हा पातळीवर लोकशाही संरक्षण न्यायाधिकरणाची स्थापनेचा प्रस्ताव आहे. लोकशाही संरक्षण कायद्याखाली निवडून येणाऱ्या प्रत्येकाला सहा महिन्यानंतर आपल्या संपत्तीची नोंद इंटरनेटवर टाकावी लागणार आहे. या कायद्याचा मसुदा भारतचे निवृत्त सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना सादर करून त्यांची मदत या कामी घेण्यात येणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.



स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरसुद्धा, मतदार अक्कलमारीच्या तंत्रातून लोकशाहीचे वस्त्रहरण करून सत्तापेंढाऱ्यांनी भारतात कुबेरशाही आणली आहे. त्यातून ७० टक्के देशवासीयांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय खऱ्या अर्थाने मिळू शकलेला नाही. त्यामुळे देशात लोकशाही संरक्षण कायदा २०२४ आणण्याशिवाय पर्याय नसल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

सध्याच्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत दिवसा धार्मिकतेचे पांखरुन ओढलेले उमेदवार रात्री धार्मिक स्थळांमध्ये मतदारांना पैसे वाटप करताना आढळून आले. एकंदरीत भारतात अक्कलमारी करून लवकर श्रीमंत होण्याचा जवळचा मार्ग राजकीय पक्षांनी आणि कार्यकर्त्यांना उपलब्ध झाला आहे. त्यासाठी ताबेमारी, गुन्हेगारी, फ्लेक्स दारोदारी या तंत्राचा सर्रास वापर अनेक वर्ष सुरू आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांच्या ठिकाणी मोठी नैतिक शक्ती होती आणि त्यांनी जीवनभर नैतिक मूल्यांची जपणूक केली. परंतु गेल्या २५ ते ३० वर्षात भारतात सार्वजनिक जीवनातील नैतिकतेचा स्तर रसतळाला गेला आहे. ज्या कार्यकर्त्यांकडे मतदार अक्कलमारी करण्यासाठी मोठा पैसा आहे, दंडेली आहे अशा लोकांना सर्रास पक्षाच्यावतीने उमेदवारी दिली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मतकोंबाडांची मते खरेदी करून आणि जाती–धर्माच्या नावावर मतदारांची फसवणूक करून मागच्या दाराने सत्ता मिळवणारे सर्वच पक्षात आढळून येतात आणि त्यातूनच सत्तामारीचा नवा मार्ग सध्याच्या पुढाऱ्यांना उपलब्ध झाला आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाकडे काही एक तत्वज्ञान आढळत नाही आणि सकाळी एका पक्षात असणारे लोक संध्याकाळी दुसऱ्या पक्षात दिसून येतात. निवडून आलेल्या आमदार, खासदारांची कोटयावधी रुपयांच्या बदल्यात सर्रास खरेदी केली जाते आणि त्यातून सत्तेच्या माध्यमातून जनतेचा पैसा विकासाऐवजी सत्ताधारी घरी घेऊन जातात, ही बाब देखील नवी राहिलेली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

सध्याच्या लोकशाहीला उन्नत अवस्था आणण्यासाठी लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यावर आधारित राजकीय पक्ष, नेते आणि आमदार–खासदार असले पाहिजेत, यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणण्याची अत्यंत गरज आहे. त्याच वेळेला या कायद्याअंतर्गत जिल्हा पातळीवर लोकशाही संरक्षण न्यायाधिकरणांची स्थापना करणे देखील आवश्यक आहे. मतदारांचे लोकशिक्षण व्हावे यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत देशपातळीवर आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी कायम स्वरूपाची व्यवस्था असणाऱ्या मंडळांची व्यवस्था सुद्धा कायद्यातून करता येणार असल्याची भूमिका संघटनेच्या वतीने मांडण्यात आली आहे.

इंग्रजांपेक्षा अधिक पटीने देशातील सत्तापेंढारी यांनी शोषण सुरू केले आहे. याला ढब्बूमकात्या आणि लोकमकात्या प्रवृत्ती कारणीभूत आहे. लोकांना बायका मुलांशिवाय आणि कुटुंबाशिवाय इतरांच्या हिताबाबत विचार करण्याची प्रवृत्ती कमी झाल्यामुळेच देशभरातील नैतिकतेची पातळी खालवली आहे. सर्वत्र चंगळवाद आणि स्वार्थ जपला जातो, त्यातूनच कायद्याचे राज्य ही संकल्पना फक्त भ्रष्टाचाराचे राज्य अशी झाली आहे. सरकारी तिजोरीवर सत्ताधाऱ्यांनी कोट्यावधी रुपयांचा बोजा निर्माण केला आहे. त्यातून सरकारमधील नोकर वर्गाला मासिक पगार देण्याइतके सुद्धा सरकारकडे पैसे उपलब्ध नाही, त्यामुळे नागरिकांना प्रत्येक कामासाठी बेकायदेशीर रीतीने पैसे मोजावे लागतील. त्यातूनच सरकारी नोकर पगाराच्या शेकडोपट जनतेकडून वसूल करून पैसे घरी नेल्याशिवाय राहणार नसल्याचे म्हंटले आहे.

देशात लोकशाही संरक्षण कायदा २०२४ आणण्यासाठी ॲड. अशोक कोठारी, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. सुभाष भोर, ॲड. कारभारी गवळी, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर घ्या वेळेवर झोप

झोपेत बडबडणं हा झोपेशी संबंधित विकार आहे. सर्व वयोगटातल्या व्यक्तींमध्ये ही समस्या असते. तसं पहायला गेलं तर ही अत्यंत सर्वसाधारण बाब आहे. झोपेत बोलणं ही वैद्यकीय समस्या असल्याचंही मानलं जात नाही. यासाठी झोपेची वेळ व उठण्याची वेळ ठरवून घ्यायला हवी. कमीत कमी ६-८ तास तरी झोप घ्यायला हवी. अपुऱ्या झोपेमुळे झोपेत बोलण्याचं प्रमाण वाढू शकतं. अतिरिक्त मद्यपानामुळेही याचे प्रमाण वाढते.

## पाककला

### सुंठाच्या मठऱ्या

**साहित्य –** सुंठ पूड ७० ग्रॅम, ओवा १ टीस्पून, मकाणे १०० ग्रॅम, रवा २५० ग्रॅम, साजूक तूप ३०० ग्रॅम, मीठ व तळणीस तेल.

**कृति –** तुपात सुंठ पूड कालवा व झाकण घालून एक आठवडा तसेच ठेवा. मकाणे कुटा व बारीक पूड करा. तिच्यात मिसळा. सुंठ मिसळलेल्या तुपातून १ वाटी तूप काढून घ्या. रवा मिश्रणात ओवा व मीठ घाला व हाताने फेटून घ्या.

मग त्यात सुंठ व उरलेले तूप ओता व घट्ट कणिक मळा. कढईत तेल तापत ठेवा. त्यात छोट्या-छोट्या पुऱ्या लाटून तळा.

## सौंदर्य

### तेलकट त्वचेसाठी

तेलकट त्वचेवरील डाग घालवण्यासाठी चंदनाचे चूर्ण गुलाबपाण्यात मिसळून लावा. हा प्रयोग उन्हाळ्यात जास्त उपयुक्त असतो.

## सल्ला

भाजलेले वांगे भाजल्यानंतर चटकन झाकून ठेवले तर त्याची साल सहजतेने काढता येईल.

## वास्तू

✻ झोपताना नेहमी दिशेचे भान ठेवायला हवे. जोडीदाराचे डोके नेहमी दक्षिणेकडे आणि पाय उत्तरेकडे हवे. कधीही बेडरुममध्ये बेडच्या समोर टीव्ही किंवा ड्रेसिंग टेबल नसावा. हे असले तर एखाद्या तिसऱ्या व्यक्तीची उपस्थिती खोलीत आहे असे वाटते.

✻ वास्तुशांती केल्यानंतरच घराचा शुभ प्रभाव आपल्यावर पडतो. ज्यामुळे आयुष्यात आनंद, सुख-समृध्दी प्राप्त होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २२ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, आश्लेषा १७।१०, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील.

**वृषभ :** व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल.

**मिथुन :** आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल.

**कर्क :** नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित करा.

**सिंह :** आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. दिवस आनंदात जाईल.

**कन्या :** मागील उधारी उसनवारी वसुल होईल. पेंडिंग राहिलेली कामे आज मार्गी लागणार आहेत.

**तूळ :** कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. जोडीदाराशी वादविवाद होतील. भाऊबंद डोके वर काढतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल.

**धनु :** उपकरणे व यंत्रे यांपासून सावध राहा. वाहने सावकाश चालवा. मागील उधारी वसुल होईल.

**मकर :** कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते.

**कुंभ :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. नोकरदार व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल. दिवस आनंदात जाईल. उपकरणे बिघडतील.

**मीन :** मित्रांचा पाठिंबा मिळेल. पत्नीशी बोलल्यानंतर मूड छान होईल. आपली इच्छा असेल तर दिवास्वप्नही खरी ठरू शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शेजारचे डॉक्टर वारले. तेव्हा एक म्हातारा दुःखी होऊन म्हणाला,
'बिचारे डॉक्टर देवाघरी गेले!'
छोट्या मधूने हे ऐकले. तो धावत धावत आईकडे गेला आणि म्हणाला, 'आई-आई! देवाची तब्येत बिघडली आहे ग! आता तू त्याची पूजा करू नकोस. त्याला विश्रांती घेऊ दे.'
'का रे बाळ?'
'आपले शेजारचे डॉक्टर त्याला औषध द्यायला गेले आहेत.'

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✻ सायना नेहवाल कोणत्या खेळाशी संबंधित आहे? – बॅडमिंटन
✻ भारताचे मिसाईल मॅन कोणास म्हणतात? – डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम
✻ गांधीजींची भारत छोडो चळवळ केव्हा सुरू झाली? – १९४२
✻ दादासाहेब फाळके पुरस्कार कोणत्या क्षेत्राशी संबंधित आहे? – चित्रपट

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११६४ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ |
| | ■ | ४ | | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | ■ | |
| ■ | ८ | | ९ | ■ | | ■ | ■ |
| १० | | ■ | | ■ | ११ | | १२ |
| ■ | १३ | | | ■ | | ■ | |
| १४ | | ■ | ■ | १५ | | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) ++ ++ + ++ करेगा ओ गाना गायेगा दीवाना सेकडोंमे पहचाना जायेगा (गाणे) ४) जी. पी. सिप्पी, रमेश सिप्पी यांचा 'शोले' नंतरचा मोठा चित्रपट जो आपटला ५) हम +++ कम नही (चित्रपटाचे नाव) ७) झुक ++ आसमान (चित्रपटाचे नाव) ८) धर्मेंद्र, हेमामालिनी, अमजदखान यात आहेत १०) ++ पाहते पुनवेची (मराठी चित्रपट) ११) +++ वाले डफली बजा ('सरगम'मधील गाणे) १३) फूल और +++ (चित्रपटाचे नाव) १४) मोहन ++ (जुन्या काळातील एक चरित्र अभिनेता) १५) ++ पाटेकर (अभिनेता)

**उभे शब्द :-** १) भारत-चीन युद्धावर आधारित धर्मेंद्र, प्रिया राजवंश यांचा एक चित्रपट २) आमिरखान, ग्रेसी सिंग यांचा एक गाजलेला चित्रपट ३) जब ++ ++ + +++ क्या ('मोगले आजम'मधील गाजलेले गाणे) ४) मै +++ तो नही मगर ये हंसी ('बॉबी'मधील गाणे) ६) कोंकणा ++ (अभिनेत्री) ८) यात स्मिता पाटीलची मुख्य भूमिका आहे ९) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा एक चित्रपट १२) ++ चंदावरकर (अभिनेत्री)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** प्रेम म्हणजे स्वर्गाचा रस्ता आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### म्हाताऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या का पडतात?

वृद्धावस्था आली की माणसात अनेक बदल होतात. डोक्यावरचे केस गळायला लागतात व टक्कल पडते. तोंडातील दात हलायला लागतात व नंतर तोंडाचे बोळके होते. बोटांना कंप सुटतो. दृष्टी अधू होते. उत्साह कमी होतो. अशा बदलांमुळे व्यक्ती चिडचिडी होते. त्यात भर म्हणजे विस्मरणही व्हायला लागते. त्यामुळे वृद्धत्व म्हणजे एक रोग, असे वाटायला लागते. चेहऱ्यावर सुरकुत्या का पडतात. याविषयी माहिती घेऊ. त्वचेखालील स्नायूंच्या आकुंचनाच्या व प्रसरणाच्या दिशेने काटकोनात त्वचेची हालचाल होत असल्याने त्वचेच्या वारंवार घड्या पडतात व तेथे नंतर सुरकुत्या पडतात. चेहऱ्याच्या त्वचेखाली इतर शरीराच्या त्वचेखाली असणारा जाडसर थर (deep fascia) नसतो व स्नायू व त्वचेचे थर एकमेकांत जखडलेले असतात. त्यामुळेही त्वचेवर जास्त ताण येतो व सुरकुत्या पडतात. दुसरे म्हणजे त्वचेखालील मेद पदार्थांचे प्रमाण कमी होते. साहजिकच त्वचा सैल वा ढिली होते. तिसरे म्हणजे स्नायूमधील ताण वयोमानानुसार कमी होतो. त्यामुळे त्वचेमध्ये खोवले जाणारे स्नायू शिथिल होतात व त्वचाही सैल होते.

सर्व इंद्रियाबरोबर त्वचेची जीवनशक्तीही कमी झालेली असते. त्यामुळे या त्वचेची लवचिकता कमी होऊन ती सैल पडते. या सर्व गोष्टींमुळे सैल पडलेल्या त्वचेवर सुरकुत्या पडतात. तोंडातील दात पडल्याने, जबड्याच्या हाडाची झीज झाल्याने चेहऱ्याचा आकारही बदलतो व त्वचा आणखीनच सैल होते. परिणामी वृद्ध व्यक्तींच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. सुरकुत्या शरीरावर पडतात. परंतु चेहऱ्यावर ती बाब जास्त प्रकर्षाने जाणवते.

## तहाने सर्वस्व गमावले

एकदा लांडगे आणि बोकड यांच्यात हद्दीवरून वाद झाला. भांडता-भांडता त्याचे लढाईत रूपांतर झाले. ते एकमेकांवर तुटून पडले. बरेच दिवस लढाई चालली, तरी कोणी कोणास हार जाईना. खरे तर लांडग्यांनी बोकडांचा कधीच फडशा पाडला असता; परंतु बोकडांच्या बाजूला असलेल्या लढाऊ कुत्र्यांपुढे लांडगे हतबल झाले.

शेवटी दोन्ही बाजूंनी तह करण्याचे ठरविले. तहात असे ठरले की, लांडग्यांनी आपली मुलं बोकडांच्या ताब्यात द्यावीत आणि बोकडांनी आपले कुत्रे लांडग्यांच्या स्वाधीन करावेत. मग याप्रमाणे अटी अंमलात येताच दोन्ही पक्ष आपापल्या हद्दीत जाऊन बसले. इकडे लांडग्यांनी दुष्टावा एकून एकेका कुत्र्याला गुपचूपपणे ठार केले; तर तिकडे बोकडांच्या ताब्यात असलेली लांडग्यांची मुले भूक लागताच मोठमोठ्यानं शंख करू लागली. मुलांचे रडणे ऐकून लांडगे धावून आले आणि बोकडांना म्हणाले,

''किती अधम आहात रे? आमच्या मुलांना मारून तुम्ही तहाच्या अटी पायदळी तुडवून तहाचा भंग केला. आता व्हा युद्धाला तयार!'' असे म्हणत लांडगे बोकडसेनेवर तुटून पडले. बोकडांच्या बाजूला कुत्र्याची सेना नसल्यामुळे थोड्याच वेळात बोकाडांचा पराभव होऊन ते सर्व ठार झाले.

**तात्पर्य :** शत्रूशी मैत्री करताना आपल्या सुरक्षिततेची साधने त्यांच्या ताब्यात कधीही देऊ नयेत.

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



क्या हम नहीं देखते कि बाहरी स्थूल संसार में राज्यों के शासक और सरकारें अपने राज्यों में अवैध विदेशी प्रवास को रोकने के लिए कानून बना देते हैं। अफरिओ जमु मारिया न जाई ।। गुरु कै शब्दै नेड़ि न आई ।। शबद सुनैतां दूर भागे ।।

मतु मारे हरि जीऊ वेपरवाहा हे ।।

(मारू मः ३)

अर्थात् काल की शक्ति बड़ी बलवान है। इसे कोई जीत नहीं सकता परन्तु यह काल भी ईश्वरीय ध्वनि से कांपता है कि कहीं वह भी शब्द हमने पिछले पृष्ठों में गुरु नानक साहब की धर्म खण्ड की व्याख्या पढ़ी है। इसके बाद महान गुरु जी ने यात्री आत्मा के भिन्न-भिन्न खण्डों में से निकलते हुए सचखण्ड तक पहुँचने की इस रूहानी यात्रा का वर्णन किया है। अगले दो खण्डों को वे क्रमवार ज्ञान खण्ड और श्रम खण्ड का नाम देते हैं। पहले में आत्मा का घेरा अत्यधिक बढ़ जाता हैं क्योंकि वह एकदम सभी सृजत की गई वस्तुओं, अनन्त शक्लों और आकारों पर इसके स्वाभावों को और कुदरत के अटल और सत् नियम को समझने लग जाती है।

### जीवन की रोशनी

दूसरे श्रम खण्ड में आत्मा शब्द की शक्ति की ओर आकर्षित होकर और वस्तुओं के असली स्वभाव के ज्ञान की झलक प्राप्त करके इनका कुछ आनंद लेने लग जाती है। इसके पश्चात् कर्म खण्ड या बख्शिश का खण्ड आता है।

पवित्र शब्द से शुद्ध हुई आत्मा सदा के लिए स्वतन्त्र हो जाती है और इसमें वासना रूपी मल का तनिक सा धब्बा भी बाकी नहीं रह जाता। माया अब इसकी आँखों पर पर्दा नहीं डाल सकती और जीव ब्रह्माण्ड और इसके बीच के सभी लोकों को जन्म देने वाली जीवन की रोशनी, नाम या शुद्ध शब्द के रूप में साक्षात्कार करने वाला और परमात्मा को चेतन अनुभव करने वाला हो जाता है।

सचखंड वसै निरंकारु ।। करि करि वैखै नदरि निहाल ।। तिथै खण्ड मंडल वरभंड ।। जे को कथै न अंत न अंत ।। तिथै लोअ लोअ आकार ।। जिव जिव हुकमु तिवै तिव कार ।। खै विगसै करि विचार ।। नानक कथना करड़ा सार ।। (जपु जी) आखिर में आत्मा सचखण्ड (सचधाम) में पहुँच कर सच का पूर्ण अनुभव कर लेती है और उसका रूप होकर उसके भाणे (हुक्म) में आ जाती है। आत्मा के ऊपर उड़ कर ऊपर चेतनता या परा-चेतनतना में जाग उठने को ही, जैसा कि पीछे कहा जा चुका है, अमर जीवन कहा जाता है जहाँ से फिर आत्मा कभी नीचे वापिस नहीं गिर सकती। ऊपर जो गुरु नानक साहब ने बयान किया है, विजनान अर्थात् भीतरी सीधे और तुरन्त अनुभव के क्षेत्र में आता है और यह ज्ञान सैद्धान्तिक ज्ञान की जानकारी जो गुरु शिष्यों को धर्म ग्रन्थों की सही व्याख्या द्वारा प्रदान करता है, से भिन्न है। एक पूरे गुरु में सारे धर्म ग्रन्थों के ज्ञान के अतिरिक्त कुछ और भी होता है। वास्तव में धर्म ग्रन्थ क्या हैं? समय-समय पर आकर मानवता को परमात्मा का सन्देश देने वाले महापुरुषों के अनुभवों का लिखित विवरण ही तो हैं। इसमें कोई सन्देह नहीं कि यदि हम पुरातन बुनियादी भाषाओं के कुशल ज्ञाता हैं तो इन धर्म ग्रन्थों को पढ़ सकते हैं परन्तु फिर भी इनके सही भाव तक नहीं पहुँच सकते और न ही हम ऊपर दिखने वाले भेदों का ठीक हल करके भिन्न-भिन्न धर्मों के धर्म-ग्रन्थों के विरोध की सरल व्याख्या कर सकते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

१०% समय हर रोज कुछ नया पढ़ने में लगाये जो आप ने कभी नहीं पढ़ा वा जाना है। दिमाग की विशेषता है यह हर दिन कुछ नयापन चाहता है। १०% ज्यादा समय अपने सम्बंधों को श्रेष्ट बनाने में लगाये। जिन लोगों से कुछ खटास है उनको मधुर केसे बनाये, उसकी युक्ति पढ़ने से ही मिलेगी। १०% समय अपने सुधार के लिये भगवान को हर रोज दे। इस समय में सिर्फ भगवान से बात करें कोई गिला छिकबा नहीं करना, अपने दुखड़े नहीं रोना । विधि बड़ी सहज है जो भी आप का ईष्ट है उसकी फोटो अपने सामने रख लो और उस से ऐसे बातें करो जैसे मातायें न्यूली बोर्न बेबी से एक तरफा बातें करती रहती हैं। ब्रह्मांड के नियम अनुसार आप के इष्ट की आत्मा वह जहां कहीं भी निवास करती है आप के विचार उसको पहुंच रहे हैं। अपने विकास के लिये अमृतवेले १०% का ज्यादा समय अपने को दें। समय प्रबन्धन और १०% का नियम (२)

जीवन में सफलता के लिये १०% का कार्य हमें करना है बाकी का ९०% कार्य कुदरत पूरा कर देती है। अपनी क्षमता को १०% बढाओ

खाता है। खिलाड़ी हर रोज खेल खेलता है,

### अंतरीक बल

व्यायाम करता है। महत्व है। नियमित रूप से कार्य करने पर वह हमारी आदत बन जाती हमारा दिमाग और शरीर जितना अभी कर रहा है उस से ज्यादा रेलगाड़ी और बसे निर्धारित समय पर दौड़ती हैं। नियमितता का बहुत कर सकता है। इस लिये जिस भी क्षेत्र में बढ़ना चाहते हैं उसे १०% ज्यादा करें। अच्छे कामों में १०% समय बढ़ाओ। जिन कार्यों को है। जो सुनते है वह भूल जाता है। जो देखतें हैं वह आधा याद रहता समाज मान्यता देता है और आप को पसंद हैं। ऐसे कामों में १०% है। जो बार बार करते है वह सदा याद रहता है। २४ घंटे में जो पढ़ा समय अधिक खर्च करो। ये कार्य हैं पढ़ना, सेहतमंद रहना और सादा रहन सहन । १०% ऊर्जा को बढ़ाओ पढ़ाई लिखाई करते समय ठंडा पानी, जूस आदि पीते रहो। ठंडे पानी से मुंह धोते रहो। समय पर सो जाओ और पूरी नींद लें। ज्यादा भारी भोजन न करें इस से नींद आती है। किसी भी प्रकार का नशा न करें। थकावट होने पर थोडी सी नींद की झपकी ले लो। १०% जल्दी उठो। जल्दी उठने से बहुत से काम आराम से हो जाएंगे। देर से उठेंगे तो हड़बड़ाहट में रहेंगे। १०% समय बर्बादी से बचाओ। अनआवश्यक कार्यों में लगने वाले समय को बचा कर अपनी एनेर्जि बढ़ाओ। १०% दिमाग से ज्यादा साकारात्मक सोचो। जब कभी आप यात्रा पर जाते हैं, आप खड़े हैं, बैठने की जगह नहीं है। ऐसे ही और परिस्थितयों में व्यस्त होने पर किसी साकारात्मक विषय पर सोचते रहें। जरा भी नकारात्मक न सोचे। १०% का नियम आप को अधिक शक्तिशाली बना देगा। अगर आप योगी है तो योग में, मुरली में, मनन चिन्तन में और सेवा में १०% समय ज्यादा दो । अध्ययन और समय प्रबन्धन

अगर आप विद्यार्थी हैं तो आप को अधिक से अधिक अध्ययन करना चाहिए। प्रत्येक विषय को प्रतिदिन समय देना है। प्रतिदिन याद की हुई विषय वस्तु दोहराए। रोगी हर रोज निर्धारित समय पर दवाई उसे दोहराना चाहिए। अगर नहीं दोहरायेगे तो सिर्फ १५% याद रहेगा। कोई व्यक्ति हमें एक बार मिलता है तो उसे हम तुरंत पहचान लेते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

वरील दोन्ही उदाहरणांमध्ये वस्तू आपल्याला अगदी अशाच पद्धतीने गर्भावस्थेत केलेल्या संस्कारमधून किती सकारात्मक ऊर्जा साध्य होणार आहे हे आपल्याला समजले असेल. सकारात्मक ऊर्जा मातेकडून गर्भापर्यंत पोहचविण्याचे कार्य हे गर्भ नाळेमार्फत वारंवार गर्भसंस्कार केल्याने होत असते. सकारात्मक ऊर्जा गर्भाला मातेमार्फत पाठवून गर्भाच्या पंचेंद्रियांचा विकास करणे व त्यातून बाळाच्या बुद्धीला चालना देऊन बाळाची बुद्धिमत्ता वाढविणे व या सर्व प्रयत्नातून बाळ तेजस्वी, हशार, बुद्धिमान, आरोग्यपूर्ण बनविणे तसेच या सर्वांमधून भारताची भावी पिढी सक्षम बनविणे व मातेचे आरोग्य चांगले ठेवणे हे गर्भसंस्काराचे उद्दिष्ट आहे.

बाळ गर्भावस्थेत असताना केलेले संस्कार जास्त प्रभावशाली असतात हे अगदी पुरातन काळापासून प्रत्येक धर्मशास्त्रामध्ये सांगितलेले आहे. आधुनिक काळात देखील विज्ञानाच्या आधाराने हे सिद्ध करून दाखविता आले आहे. गर्भवती स्त्री नऊ महिन्यांमध्ये ज्या पद्धतीने दिनचर्येचे पालन करेल, जसा आचार-विचार ठेवेल व ज्या पद्धतीने आहार-

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

विहार करेल त्याचा सर्व परिणाम हा गर्भस्थ बाळावर होत असतो. हिंदूधर्मशास्त्रातील पवित्र अशा रामायण ग्रंथात याचा उल्लेख आहे की, कौसल्या मातेला प्रभु रामचंद्रांच्या वेळी गर्भवती असताना जंगलामध्ये जावे, फळे, कंदमुळे खावी, धनुष्य बाण घेऊन युद्ध करावे व राक्षसांचा नायनाट करावा, एकांतात ध्यानधारणा करावी, अशा प्रकारच्या इच्छा होत होत्या.

ज्ञानेश्वर महाराज जन्मास येण्यापूर्वी त्यांचे आई-वडील रुक्मिणीबाई व विठ्ठलपंत यांना जाणीव होती की, आपल्या मुलांना भावी आयुष्यात जीवन जगताना भरपूर संघर्ष करावा लागणार आहे. त्यांच्या दोघांच्या विचारांची उत्स्फूर्त स्पंदनेच गर्भस्थ बाळांवर सतत पडून समविचारी, समभावी बालके निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई जन्मास आली व त्या बालकांनी जीवनातील संघर्षांना आध्यात्मिक सामर्थ्याने तोंड दिले व त्यानंतर ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वांच्या मनातील दुष्टपणा नाहीसा करण्यासाठी तसेच काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, भय या वाईट विचारांपासून परावृत्त होण्यासाठी व सर्व विश्वामध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित होण्यासाठी बाल वयातच ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ व पसायदान लिहिले व याचे बाळकडू त्यांना गर्भस्थ बाळ असतानाच मिळाले. सात बालकांची हत्या करणाऱ्या दुष्ट कंसाचा संहार करण्यासाठी माझ्या पोटी देवतुल्य बालक जन्माला यावे अशी धारणा वारंवार माता देवकी बाळकृष्णाच्या वेळी गर्भवती असताना करत असे व ती उत्स्फूर्त स्पंदनेच गर्भस्थ बाळकृष्णाला मिळाली व त्यातूनच त्याला राक्षसांचा उपद्रव व कंसाचा संहार करण्याची प्रेरणा मिळाली.

जिजाऊ माता बाळ शिवबाच्या वेळी गर्भवती असताना, घोड्यावर स्वार व्हावे, तलवारीने लढाई करावी व यवनांचे पारिपत्य करून आपले हिंदवी स्वराज्य स्थापन करावे अशा इच्छा त्यांना होत होत्या.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# 'संविधान जागर महोत्सव'च्या स्वागताध्यक्षपदी अशोक सब्बन

### मानवाधिकार अभियान, सीएसआरडी व समाजकल्याण विभागाचा 'संविधान नितीमुल्ये रूजविण्यासाठी' पुढाकार



नगर – मानवाधिकार अभियान, सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सहायक आयुक्त कार्यालय समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्ह्यातील समविचारी संस्था, संघटना, महाविद्यालये व सामाजिक कार्यकर्ते यांच्या पुढाकारातून अहमदनगरमध्ये २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त 'संविधान जागर महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले. या दृष्टीकोनातून संविधान जागर महोत्सव समन्वय समितीची बैठक नुकतीच पार पडली.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.महेबूब सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असणारे ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक सब्बन यांची 'संविधान जागर महोत्सवा'च्या स्वागताध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

या बैठकीस मानवाधिकार अभियानाचे प्रदेशाध्यक्ष ॲड.संतोष गायकवाड, संध्या मेढे, सॅम्युअल वाघमारे, युनूसभाई तांबटकर, दीपक अमृत, डॉ.प्रशांत शिंदे, सुधीर लंके, संजय कांबळे, डॉ.बापू चंदनशिवे, कॉ.भैरवनाथ वाकळे, अविनाश कांबळे, उद्धव काळापहाड आदी समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते.

अशोक सब्बन हे मागील ३० वर्षापासून अण्णा हजारे यांच्या समावेत कार्यरत असून भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे जिल्हाध्यक्ष म्हणून यापूर्वी त्यांनी कार्य केले आहे. सध्या ते राज्य सरचिटणीसपदी कार्यरत आहेत. यासोबत ते राष्ट्रीय लोकआंदोलनाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून तर भारतीय जनसंसद या संघटनेचे राज्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते राज्यस्तरीय सल्लागार समिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे व विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती नाशिक विभागाचे अशासकीय सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

यशदा, पुणे व हैदराबाद येथील राष्ट्रीय पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे मास्टर ट्रेनर म्हणून माहिती अधिकार अधिनियम, पंचायतराज, आमचं गाव, आमचा विकास, शाश्वत विकास, ग्रामसभा, पाणलोट, दारूबंदी, रेशन धोरण, दप्तर दिरंगाई, सेवाहमी कायदा याविषयासह महापुरुषांचे विचार, संविधान जागृती आदी पुरोगामी विषयावर राज्यभर अनेक व्याख्याने व प्रशिक्षणे दिली आहेत.

त्यांनी पुरोगामी चळवळीत व अनेक सामाजिक जनआंदोलनामध्ये सक्रीय सहभाग व नेतृत्व केले. दिल्लीतील चार आंदोलनाचे नियोजन व नेतृत्व करत आपले योगदान दिले. संविधानातील नितीमुल्ये समाजामध्ये खोलवर रुजावीत म्हणून ते अविरत कार्यरत आहेत. संविधान जागर महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी त्यांनी निवड झाल्यामुळे सर्वत्र अभिनंदन होत आहे.संविधान जागर महोत्सवाविषयी अधिक माहिती देतांना मानवाधिकार अभियानाचे प्रदेशाध्यक्ष ॲड.संतोष गायकवाड यांनी सांगितले, मानवाधिकार अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी 'संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. संविधान जागर महोत्सवाचे यंदाचे ७ वे वर्ष आहे. याही वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्सवाच्या स्वरुपात साजरा करण्याचा मानवाधिकार अभियान तसेच जिल्ह्यातील सर्व पुरोगामी संस्था संघटना यांचा मानस आहे.

समन्वय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार संविधान जागर महोत्सवांतर्गत यावर्षी संविधान रॅलीच्या सोबतच संविधनाचा अधिकाधिक प्रचार व्हावा म्हणून संविधान जागर रथ, पथनाट्य, संविधान गीते, प्रबोधनपर व्याख्याने, चर्चासत्रे, शासकीय योजनांची प्रचार प्रसिद्धी या स्वरुपात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, उंडा संस्था आणि शिशुगृह, नगर संस्था आयोजित दत्तक प्रक्रिया जाणीव जागृती कार्यशाळेत बोलताना न्यायाधिश भाग्यश्री पाटील.

# दत्तक प्रक्रियेच्या जागृतीबाबत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याची गरज

### न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांचे प्रतिपादन

नगर – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, उड संस्था आणि शिशुगृह अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेच्या प्रसंगी बोलताना काळजी व संरक्षण याची गरज असलेल्या बालकांना प्रतिपालक प्रक्रियेत आणून त्यांना हक्काचे घर आपण देऊन अनाथ बालकांच्या पुनर्वसनासाठी सर्व संस्थांनी प्रयत्न करावेत तसेच बालकांच्या हक्कासाठी कोणत्याही प्रकराची मदत लागल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदैव तत्पर असल्याचे आव्हान न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी केले.

तसेच न्यायाधीश निर्मले यांनी देखील दत्तक पालक असल्याचा अनुभव सर्वांसोबत व्यक्त केला. तसेच बाल कल्याण समिती अध्यक्ष ॲड. जयंत ओहोळ यांनी दत्तक प्रक्रिया व प्रतिपालकत्व याची गरज ओळखून सर्व सर्व प्रशिक्षणार्थीना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या सोबत बाल कल्याण समिती सदस्य ॲड. अनुराधा येवले व तुषार कवडे यांनीही शुभेच्या दिल्या.

एकदिवसीय कार्यशाळेत प्रतिपालकत्व व दत्तक जाणीव जागृती महिना साजरा करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हा बाल संरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांनी केले. कार्यशाळेचे मार्गदर्शक हे WIC चे सहदेव कांबळे व शिशुगृहाचे मॅनेजर शीतल प्रभुणे हे होते. त्यांनी दत्तक प्रक्रिया व संस्थांचा सहभाग यावर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व संस्था उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजिंक्य आंधळे यांनी केले व आभार प्रदर्शन जुई जावरे यांनी केले.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी मधील प्रा.प्रशांत नरवडे यांना पी.एच.डी. प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशांत आण्णासाहेब नरवडे यांना छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मॉडेलिंग सिम्युलेशन ॲण्ड ॲनालिसीस ऑफ सस्पेंशन सिस्टीम वुईथ मॅगनेटो रीऑलॉजीकल डॅम्पर या विषयावर यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमात त्यांना छत्रपती संभाजी नगर येथील जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे मेकॅनिकल विभागाचे डॉ.रविंद्र देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.प्रशांत नरवडे यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी स्कोपस इंडेक्स इंटरनॅशनल जनरल यामधे ०४ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ४ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

डॉ. प्रशांत नरवडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे उपसंचालक सुनिल कल्हापुरे प्राचार्य डॉ.उदय नाईक तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा–यांनी अभिनंदन केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ.पी.एम. गायकवाड यांनी त्यांचे कौतुक केले.

# आनंदधाम येथे मनिषा मुनोत यांना 'संघ सेवा रत्न पुरस्कार' प्रदान



आनंदधाम येथे मनिषा मुनोत यांना धार्मिक कार्यातील उत्स्फूर्त सहभाग आणि विविध कार्यक्रमांच्या नियोजनात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल संघ सेवा रत्न पुरस्कार प्रदान करताना जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत. समवेत जैन साधू–साध्वनीजी आदी.

नगर – धार्मिक कार्यातील उत्स्फूर्त सहभाग आणि विविध कार्यक्रमांच्या नियोजनात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल मनिषा मदन मुनोत यांना आनंदधाम येथे संघ सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी हा पुरस्कार मुनोत यांना प्रदान केला. महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, चातुर्मासानिमित्त आनंदधाम येथे विराजमान कोटा संघप्रमुख उपप्रवर्तक श्रुतमुनीजी महाराज, तप रत्नाकर अक्षरमुनीजी म हाराज, सेवाभावी मधुरमुनीजी महाराज, आलोकऋषीजी महाराज, सत्यप्रभाजी म.सा., पवित्रदर्शनाजी म. सा., तन्मयदर्शनाजी म.सा., विनीत दर्शनाजी म.सा. यांच्या सान्निध्यात चातुर्मास २०२४ मधील उत्कृष्ट सेवा कार्यासाठी मनिषा मुनोत यांना हा पुरस्कार देण्यात आला.

मनिषा मुनोत यांना सन २०१६ मध्ये अनुपमाजी म.सा. यांनी उत्कृष्ट सुश्राविका तसेच सन २०२२ मध्ये तारकऋषीजी म.सा. यांनी श्रमणोपासिका पुरस्काराने सन्मानित केले होते. यंदाच्या पुरस्कार वितरणावेळी श्रावक संघाचे पदाधिकारी संतोष बोथरा, संतोष गांधी, अभय लुणिया, प्रितम गांधी, बाबुशेठ लोढा, रतिलाल कटारिया, अनिल दुगड, अमोल कटारिया, राजू बोरा, नितीन कटारिया, मदन मुनोत आदी उपस्थित होते.

हस्तीमल मुनोत म्हणाले, यावर्षीही आनंदधाम येथे ऐतिहासिक चातुर्मास उत्साहात पार पडला. नित्य प्रवचन, विशेष धार्मिक कार्यक्रम, जपतप, आराधना पार पडली. यात श्रावक श्राविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येकाला एक मोठी ऊर्जा साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात प्राप्त झाली. मनिषा मुनोत यांनी साधूसाध्वीजींची सेवा करताना सर्वच कार्यक्रमांसाठी विशेष योगदान दिले.

मनिषा मुनोत म्हणाल्या की, साधूसाध्वीजींची सेवा करत धर्म कार्यात योगदान देताना आत्मिक समाधान लाभते. चातुर्मास धर्म कार्याची सुंदर पर्वणी असते. या काळात धर्माचरण करताना सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. संघ सेवा रत्न पुरस्कार आणखी चांगले कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे.




शहरातील बडीसाजन मंगल कार्यालयात झालेल्या डोनेट फर्स्टच्या फनोरंजनाने वंचित, दुर्बल, निराधार चेहेऱ्यावर हास्य दिसत आहे. बालभवन आणि तपोवन मधील विद्यार्थी.

# डोनेट फर्स्टच्या फनोरंजनाने वंचित, दुर्बल, निराधार विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

### सांस्कृतिक कार्यक्रम व विविध मनोरंजनात्मक खेळात सहभागी होऊन केली धमाल, विद्यार्थ्यांना दैनंदिन उपयोगी साहित्य व भेट

नगर – महिलांचे संघटन करुन गरजू घटकातील परिवारांना आधार देणाऱ्या डोनेट फर्स्टच्या महिलांनी वंचित, दुर्बल, निराधार विद्यार्थ्यांसाठी फनोरंजनाचा आगळा–वेगळा उपक्रम राबविला. बडीसाजन मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात बालगोपालांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करुन विविध मनोरंजनात्मक खेळातून धमाल केली.

शहरातील बडी साजन मंगल कार्यालयात झालेल्या या फनोरंजन उपक्रमात बाल भवन आणि तपोवन बालप्रकल्प येथील विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रहांचा प्रभाव या कार्यक्रमात बालकांना समजवून सांगण्यात आले. यावेळी विविध खाद्य पदार्थ व मनोरंजनात्मक खेळाचे स्टॉल लावण्यात आले होते. महिलांनी थाटलेल्या विविध खाद्य पदार्थांच्या स्टॉलला विद्यार्थ्यांनी भेट देऊन खाद्यांचा आस्वाद घेतला.

कार्यक्रमाचे प्रारंभ नवकार मंत्र, गणेश वंदनेने करण्यात आले. यावेळी रंगलेला जादूगार शो, हास्य विनोद शो, रिंग डान्स, टैलेंट शो, एक मिनट गेम, लकी ड्रॉ व विविध खेळाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डोनेट फर्स्टने वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. विविध स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक भेट वस्तूंचे बक्षीस देण्यात आले.

या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना ग्रुपच्या माध्यमातून दैनंदिन उपयोगी साहित्याचे किट व बैग भेट देण्यात आली. बालकांना भेट वस्तू दिल्या. विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमानंतर फनोरंजनाचा कार्यक्रम सर्वांसाठी खुला करण्यात आला होता. या उपक्रमाला अबालवृध्दांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

समाजातील गरजूंना मदत देण्यासाठी पाच मैत्रीणींपासून सुरु झालेल्या ग्रुपचे शहरातील महिला सदस्या आहेत. सामाजिक बांधिलकी जपून ग्रुपच्या महिला योगदान देत आहे. वंचित विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमास बडीसाजन ओसवाल श्रीसंघ, मुनोत नेवासकर ग्रुप, बडीसाजन युवक संघ, जैन ओसवाल युवक संघ, जीतो संघ, जैन ओसवाल क्रेडिट ग्रुप, जय आनंद ग्रुप, दिगंबर संघ, मंदिर संघ, महावीर ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रुपच्या सर्व महिला सदस्यांनी परिश्रम घेतले.

# अभिनेत्री व चित्रकार ईशा अग्रवाल यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना दिले चित्र भेट



अभिनेत्री चित्रकार ईशा अग्रवाल यांनी (प्रजापति ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय पुणे से केंद्राच्या) राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांना स्वत: रेखाटलेले चित्र देताना.

नगर – प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या बाणेर, पुणे सेवा केंद्राच्या साधक अभिनेत्री आणि चित्रकार ईशा अग्रवाल यांनी नुकतेच एक मोठे यश संपादन केले. त्यांनी भारताच्या सन्माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना स्वतःच्या हाताने रेखाटलेले सुंदर चित्र राष्ट्रपती भवन येथे भेट दिले. आत्मजागृतीचे प्रतीक असलेल्या या चित्राने राष्ट्रपतींचे मन जिंकले. त्यांनी या कलाकृतीचे वर्णन प्रेरणादायी व मनोहर असे केले.

सुमारे २८ मिनिटे चाललेल्या या भेटीदरम्यान ईशा अग्रवाल आणि राष्ट्रपतींनी जीवन, कला, करिअर आणि आध्यात्म यावर मनमोकळा संवाद साधला. राष्ट्रपतींनी ईशा यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले: आभाळच मर्यादा आहे.

ईशा अग्रवाल यांनी हा अनुभव शेअर करताना सांगितले, इतक्या सशक्त आणि प्रेरणादायी नेत्या भेटणे हा सन्मान होता. त्यांच्याकडून माझ्या कामासाठी आशीर्वाद मिळणे, हे खूपच मोठे भाग्य आहे. हा क्षण माझ्या कलेवरच्या प्रेमाचा आणि चिकाटीचा पुरावा आहे.

या कलाकृतीला पूर्ण होण्यासाठी जवळपास एक वर्ष लागले असून ती ईशा यांच्या कलात्मक प्रतिभेचे आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक आहे. या भेटीने त्यांच्या कलेतील योगदानाची झलक मिळते आणि समाजावर सकारात्मक प्रभाव पाडण्याचा त्यांचा प्रवास अधोरेखित होतो. हा विशेष क्षण ईशा अग्रवाल यांची कला, चित्रपट आणि आध्यात्म यांची अनोखी सांगड जगासमोर आणतो. त्यांच्या यशाची ही गाथा अनेकांसाठी प्रेरणा ठरेल, अशी अपेक्षा आहे.

# नागेबाबाची प्रेरणादायी विचारांची दिनदर्शिका ही सर्वांची मार्गदर्शिका

### युवाहृदयसम्राट रामायणाचार्य समाधान शर्मा महाराज यांचे प्रतिपादन

नगर – धकाधकीच्या जीवनात तुमचे शरीर स्थिर व मन चंचल झाले आहे. अशा विपरीत परीस्थित वाढलेला ताण तणाव कमी होण्यासाठी ग्रहणशक्ती वाढवणे आवश्यक आहे. प्रसन्नता व आनंद वाढण्यासाठी अंत:प्रेरणा व अध्यात्मिक शक्ती कमी होवू देवू नका. नागेबाबा संस्थेचा पाया अध्यात्म आहे. त्यामुळे चांगले प्रेरणादायी विकारांचे बीजे येथे पेरली जात आहेत. जगात चांगल्या विचाराचे धन सर्वश्रेष्ठ आहे ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. अशा चांगल्या प्रेरणादायी विचारांची नागेबाबाची दिनदर्शिका ही सर्वांसाठी मार्गदर्शिका ठरो, असे प्रतिपादन युवाहृदयसम्राट रामायणाचार्य समाधान शर्मा महाराज यांनी केले.

दिनदर्शिकेच्या पानापानात मनापासून केलेली कुठलीच प्रार्थना व्यर्थ जात नाही, आपल्या कामाची जागा म्हणजे कार्य मंदिरच, थांबू नका यश तुमची वाट पाहतंय, अशा अनेक प्रेरणादायी व सकारात्मक विचारांचा समावेश असलेल्या संत नागेबाबा मल्टीस्टेट सोसायटीच्या २०२५ वर्षांच्या 'विचारधन' दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रसंगी रामायणाचार्य समाधान शर्मा महाराज बोलत होते.

नागेबाबा संस्थेचे चेअरमन कडूभाऊ काळे यांच्या संकल्पनेतून व विचारातून विचारधन दिनदर्शिकेची निर्मिती झाली आहे. यावेळी प्रमुख पाहुणे आर्टिस्ट ज्ञानेश शिंदे, संजय मनवेलीकर, प्रा.सविता नवले, गणेश दळवी, जालिंदर शिंदे, ॲड.राउत, संजय नवले आदींसह संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविकात संजय मनवेलीकर म्हणाले, नागेबाबा संस्थेची विचारधन दिनदर्शिका जिल्यात घरोघर जात असल्याने सर्वांना वर्षभर चांगल्या विचारांची प्रेरणा देत असते.

ज्ञानेश शिंदे म्हणाले, कडूभाऊ काळे यांचा प्रत्येक विचार हा प्रेरणादायी आहे. त्यामुळेच दरवर्षी अशा प्रेरणादायी विचारांच्या दिनदर्शिका तयार करण्याची प्रेरणा मिळत आहे. या दिनदर्शिकेची सर्व नागरिक वाट पहात असतात.

यावेळी अनिल कदम यांनी स्वागत केले. योगिता पटारे यांनी सूत्रसंचालन केले तर महेश पंडित यांनी आभार मानले.



श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट सोसायटीच्या २०२५ वर्षाच्या विचारधन दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना रामायणाचार्य समाधान शर्मा महाराज. समवेत चेअरमन कडूभाऊ काळे, ज्ञानेश शिंदे, संजय मनवेलीकर, सविता नवले ज्ञानेश शिंदे, गणेश गवळी आदींसह अधिकारी



दौंड रोडवरील व्हिंटेज हिल्स येथे निसर्गाच्या सान्निध्यात हुरडा पार्टीला सुरुवात झाली.

# व्हिंटेज हिल्स येथे हुरडा पार्टीला सुरूवात

नगर – नगर – दौड रस्त्यावरील हिवरे झरे येथील व्हिंटेज हिल्स येथे हुरडा पार्टींना सुरूवात झाली आहे. निसर्गरम्य वातावरणात २१ प्रकारचे डव्हेंचर स्पोर्टर्स, अस्सल चवीचा हुरडा, झणझणीत मिसळ, गरमागरम पिठलं भाकरी असा मेन्यू हुरडा पार्टीची लज्जत वाढवणारा ठरतोय. या हुरडा पार्टीच्या शुभारंभ प्रसंगी उद्योजक रोनक मुनोत, संजोग मुथा, आर्किटेक्ट प्रल्हाद जोशी, राज मुनोत, अभय गुजराथी, ऋतिक मुनोत, भारत गुरूनानी, अमृत पितळे, स्वर्णीम मुथा, सौरभ संकलेचा आदी उपस्थित होते.

व्हिंटेज हिल्स येथे सकाळपासून संध्याकाळपर्यंत अतिशय प्रसन्न वातावरणात हुरडा पार्टीची व्यवस्था करण्यात आली आहे. सहकुटुंब, मित्र परिवारासह याठिकाणी हुरड्याचा आस्वाद घेता येतो. सकाळी आगमन होताच मिसळ पाव, फरसाण, कांदा, लिंबू, जिलेबी, चहा, कॉफी, बिस्किट असा नाश्ता घेतल्यानंतर परिसरातील विविध गेम्स, धाडसी खेळांचा सुरक्षित आनंद घेता येतो.

दुपारी गरमागरम हुरडा, खोबरा चटणी, शेंगदाणा चटणी दही, रेवडी, गुडीशेव, स्वीट कॉर्न बॉईल, बोरं, पेरू असा रानमेवा मिळतो. जेवणात तवा रोटी, पिठलं भाकरी, काळा मसाला हंडी, बेंगन मसाला, व्हेज पुलाव, गुलाबजाम, पापड, चटणी, लोणचं, सलाड असा चविष्ट मेन्यू आहे.

संध्याकाळी भेळ, कांदा भजी, चहा कॉफी घेऊन व्हिंटेज हिल्सचा निरोप घेतला जातो. अतिशय रम्य वातावरणात गप्पा गोष्टी करत, विविध खेळांचा आनंद घेत सर्वांना संस्मरणीय हुरडा पार्टीचा आनंद मिळतो. तसेच याठिकाणी मुक्कामाची सुद्धा अतिशय चांगली व्यवस्था आहे. व्हिंटेज हिल्स येथे हुरडा पार्टीसाठी बुकींग सुरू झाले आहे. रेन डान्स, पूलचीही व्यवस्था याठिकाणी आहे. अधिक माहिती बुकींगसाठी संपर्क: ६२६२९०६२६२

# 'साईबन'च्या निसर्गरम्य परिसरात हुरडा महोत्सवचा शुभारंभ, भट्टी पुजन

नगर – डॉ. कांकरिया दांम्पत्याच्या दूर दृष्टी व अथक परिश्रमामुळे साईबनची निर्मिती झाली. जिथे अनेक शतके गवतही उगवले नाही अशा खडकाळ उजाड माळरानावर मोठ्या परिश्रमाने पाणी अडवा व जिरवा ह्या तत्वाचा अवलंब करून १०० एकरवर वनराई उभी केली ह्याचा आम्हाला नगरकरांना अभिमान आहे. असे गौरवोद्गार चित्रकार प्रमोद कांबळे ह्यांनी काढले. प्रसंग होता साईबनमध्ये हुरडा महोत्सवाचा शुभारंभ.



साईबनच्या निसर्गरम्य परिसरात हुरडा महोत्सवाचे भट्टीपूजन करताना गुंडेगावचे भापकर गुरूजी. समवेत डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, प्रमोद कांबळे आदी.

ह्या हुरडा महोत्सवाच्या रांजण व भट्टीचे पुजन गुंडेगावचे भापकर गुरूजी यांच्या हस्ते साईबनच्या निसर्गरम्य करण्यात आले. ह्या प्रसंगी प्रमोद मोरे (अध्यक्ष निसर्ग व प्रदूषण निवारण महामंडळ महाराष्ट्र), चित्रकार प्रमोद कांबळे, सी ए रमेश फिरोदिया, रोटरीचे माजी अध्यक्ष माधव देशमुख, कौशिक कोठारी, महावीर मेहेर, दिपक गुजराथी आदि उपस्थित होते.

श्री. भापकर गुरूजी म्हणाले की मी स्वत: शेतकरी आहे त्यामुळे मी शेतीचे मूल्य जाणतो, हुरडाची निर्मिती करणे ही सोप्पी गोष्ट नाही. डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरियांनी कष्टाने हे साईबन उभे केले व इथे जगातील पहिला हुरडा पिकतो त्याचा शुभारंभ आज आमच्या हस्ते होत आहे ही नक्कीच आनंदाची बाब आहे. साईबनच्या हुरडयाची चव काही न्यारीच आहे. गोड, स्वादिष्ट, चवदार, मऊ लुसलुशीत हुरडा खाऊन मन तृप्त होते. त्यासोबतच रेवडी, गुडीशेव, वेगवेगळया चटण्या, साथीला बोरं, आवळे, पेरू, वगैरे ने हुरडयाची लज्जत आणखीनच वाढते.

हुरडा ही महाराष्ट्रीयन व भारतीय संस्कृती असून त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यात आपण राहिल्याचा एक वेगळा स्वर्गीय आनंद मिळतो सहकुटुंब, मित्रमंडळीच्या समवेत हुरडयाचा आनंद लुटणे हा एक अविस्मरणीय ठेवा आहे. असे आपल्या स्वागतपर मनोगतात डॉ. सौ. सुधा कांकरिया यांनी व्यक्त केले तर डॉ. प्रकाश कांकरिया यांनी प्रास्ताविकात ही धरती आपली माता आहे ह्या वनराईने दिलेल्या प्राणवायुमुळे आपण जिवंत राहतो ह्याचे भान ठेवायला माणूस विसरला आहे आपल्या स्वार्थासाठी जंगलतोड करून प्रदुषण वाढले असून सगळ्यांच्या जिवीताला धोका निर्माण झाला आहे.

आम्ही मागील २५ वर्षा पासून साईबनची केलेली ही निर्मीती माझी धरणीमातेला एक वेगळी अशी भेट दिली आहे. तसेच साईबनचा इतिहास सांगुन व मोहन धारीया व अण्णा हजारे यांचे मार्गर्शन लाभल्यामुळे हे धाडस करू शकलो याचा उल्लेख केला. असेही डॉ. प्रकाश कांकरिया यांनी सांगितले. हुरडा पार्टीचे आकर्षक पॅकेज उपलब्ध असून सहकुटुंब हुरडा, नाष्टा, जेवण व साईबनच्या ॲक्टीव्हीटीज, बोटींग, नक्षत्र उद्यान, बिनबादल बरसात, झीप लाईन, पपेट शो, बटरफ्लाय गार्डन अशा बऱ्याच गोष्टींचा आनंद पर्यटकांना घेता येईल व शालेय सहलींना विशेष सवलत देण्यात येते. अशी माहिती साईबनचे मॅनेजर सतिष शिंदे व बाबासाहेब शेवाळे यांनी सांगितले. संपर्क क्रमांक ९११२२८८६२२ /९०९६६३९३६८. ह्या प्रसंगी वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सिंधी समाजातर्फे पुणे (पिंपरी), नाशिक व नागपुर येथे वर-वधु परिचय संमेलन

नगर – सिंधी प्रोगेस मॅट्रीमोनियम ऑर्गनाइजेशन पिंपरी पुणे द्वारा आयोजित येथे १ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते सायं ४ वाजेपर्यंत होणार आहे. फोर्म भरण्याची अंतिम तारिख २२ नोव्हेंबर ठिकाण : बी.टी आडवाणी हॉल, पिंपरी पुणे जवहर कोटवानी– ९८२२५६२००५, श्रीचंद्र नागराणी ९८२२३२६८१८, कुमार मोटवानी – ९८२३०१६४२५, टेहेल चुगानी – ९८२३६६८८७८, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) –८९९९८१२४०८ येथे संपर्क करणे.

नासिक प्यारा परिवार सोशल फाऊंडेशनतर्फे ग्रुपच्या हिशोबाने वर–वधु परिचयाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी किशोर कंत्रोड, महेश नागपाल, शाम मोटवानी यांच्याशी संपर्क करणे. एंट्री चालू आहे लवकरात लवकर रजिट्रेशन करून घेणे.

नागपूर सिंधी सोशल फार्म व पुज्य समाज आश्रमतर्फे ८ डिसेंबर रोजी पोस्ट ग्रॅज्युएट मुला मुलींसाठी संमेलनचे आयोजन करण्यात आले आहे. फोर्म भरण्याची अंतिम तारिख २२ नोव्हेंबर, ठिकाण– जगत सेलिब्रेशन हॉल, रिंगरोड, जरीपटका, नागपूर अधिक माहितीसाठी नागपूर सिंधी सोशल फोरम – ९५०३२३७१६१, मोहन मंजानी – ७८८७५६५१४७, पुज्य समाधा आश्रम, प्रकाश चेतवानी – ७५८८७६३०८१, दिलीप सावलानी– ९३७३४५४८००, किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ यांच्याशी संपर्क करणे.

या संमेलनाच्या हेतु असा आहे की, आजच्या नवयुगात प्रत्येकाला आपल्या योग्य जीवनसाथीची निवड करता यावी योग्य माहिती मिळावी. संयोजकांच्या वतीने विनंती करण्यात येते की, ज्यांना सदर परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्या सोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही.

अधिक माहितीसाठी :– पुणे वर्षा मोहनानी – ९०४९४६४१५१, सोलापुर मीना नगदेव – ८६६८५०९०३०, नांदेड चंद्रप्रकाश लालवाणी– ९४२२१७४७५१, उल्लासनगर विनोद भारानी – ९८२२०६५७४४, न्यु मुंबई सुभाष गोगिया झुलेलाल मंदिर – ९८२११३०५९०, बीड– डॉ. मदनलाला जेसवानी– ९८९०४६०७००, ठाणे संतराम माखिजा – ९८१९५१०७४४, इंदोर प्रकाश मदनानी– ८९८९६२५९२०, डोंडेचा संजय पुरसवानी – ९९२३०९७६१६,नाशिक प्यारा परिवार शाम मोटवानी – ९८२२०६१६१२, महेश नागपाल – ९८२२०९४९६०, सामाजिक संस्था एक पहल और मॅरेज ब्युरो व जव्हर नगर पुज्य सिंधी पंचायत द्वारा रायपूर (छत्तीसगड) येथे अधिक माहितीसाठी ७९७४८९०७२९ / ९३२९१२८५१९ / ९४२५२१२१०८. हैदराबाद मॅरेज ब्युरो हिरा हॉल, अशोक वासवानी – ९८४९४७७९७४ मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदिरा कॉलनी, तारकपूर, किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ अहिल्यानगर येथे संपर्क साधावा.

या कार्यक्रमात नाव देऊन नातलगामध्ये होणाऱ्या कमी करण्यासाठी व ज्यादा शहर न फिरता एक ठिकाणी येऊन आपल्या जिवनसाथीची योग्य निवड करता यावी व आयोजकांना समाजसेवेची संधी मिळावी, असे मोहन मंजानी, दिलीप सावलानी, जवहर कोटवानी, श्रीचंद्र नागराणी, मोटवानी, महेश मध्यान, महेश नगपाल व किशोर कंत्रोड यांच्यावतीने करण्यात येत आहे.

## सौ. संगिता फिरोदिया यांच्या १५ उपवासाची तपसाधना पुर्णाहुती



नगर – सौ. संगिता श्रीकांत फिरोदिया यांची १५ उपवासाची पचकावणी १९ नोव्हेंबर रोजी संस्कार मंच प्रणेता, श्रमण संदीय उपप्रवर्तक 'सिध्दराज' श्री. सिध्दार्थ मुनीजी म. सा. तथा डॉ. सौम्याश्रीजी म. सा., तीर्थश्रीजी म. सा., रिध्दीश्रीजी म. सा. यांच्या सान्निध्यात सावेडी धर्मस्थानकाकडे झाली.

कार्यक्रमास मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सौ. संगिता फिरोदिया अहमदनगर मर्चंट्स को. ऑप. बँकेचे माजी शाखाधिकारी श्रीकांत फिरोदिया यांच्या त्या धर्मपत्नी आहेत.

त्यांच्या दोन्ही कन्या सौ. मोनिका बोरा व कु. सोनम फिरोदिया दोघींनीही ९ उपवासाची तपश्चर्या करून तसेच त्यांचे पती श्रीकांत फिरोदिया यांना चालू चातुर्मासात सलग ३ मास खमन पूर्ण करून १०० आयंबिल शतक पूर्ण करून कौटुंबिक सहभाग नोंदविला.





एसा आणि कॉस्ट्रोमॅन यांच्या संयुक्त विद्यमाने वॉर प्रूफ केमिकल उत्पादने आणि त्यांची प्रात्यक्षिके सादर करताना कंपनीचे टेक्निकल हेड जैनुद्दीन मुल्ला. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित सभासद. (छाया– लहू दळवी)


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

जाहीर नोटीस–०२/२०२४

तमाम लोकांना या जाहीर नोटीव्दारे कळविण्यात येते की, म.औ.वि.म. अहिल्यानगर औद्योगिक क्षेत्र ता. नगर, जि. अहिल्यानगर या औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र. बी–१०/२/९ हे महाराष्ट्र विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून सदर भुखंडातील लहान मोठी झाडे काढण्यासाठी तसेच फांद्या छाटण्याकरिता वृक्ष अधिकारी म्हणून माझ्याकडे परवानगी मागितलेली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| नाव व भुखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष तोडीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| मे. ऑप्शन इंजिनिअरींग वर्क्स, भुखंड क्र. बी–१०/२/ ९, अहिल्यानगर . | ०४ | नवीन औद्योगिक इमारत उभारण्याकरिता | |

तरी कलम ११(२) Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of trees Act. १९७५ कलम ८ नुसार सदर झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या हरकती असल्यास तसे त्यांना आम्हांस ही नोटीस पोहचल्यापासून ८ दिवसाच्या आत खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. तसे कोणी न कळविल्यास मागणीप्रमाणे झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत मुख्यालय कार्यालयाची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, नंतर कोणाची कसली ही तक्रार चालणार नाही म्हणून जाहीर नोटीस दिली.

आयएफएमएस क्र./P-353722 /२०२४.
मऔदिम, स्थापत्य, उपविभाग,
उपअभियंता यांचे कार्यालय,
अहिल्यानगर.
दिनांक: २१/११/ २०२४.

**उपअभियंता तथा विशेष नियोजन प्राधिकारी,**
म.औ.वि.म., स्थापत्य उपविभाग, अहिल्यानगर
Tel. No. 0241-2777970
E-mail: deahilyanagar@midcindia. Org


# एसा आणि कॉस्ट्रोमॅन यांच्या संयुक्त विद्यमाने वॉटर प्रूफ केमिकल उत्पादने व प्रात्यक्षिक सादर

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहमदनगर आणि कॉंस्ट्रोमॅन यांच्या संयुक्त विद्यमाने सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कॉंस्ट्रोमॅन कंपनीचे टेक्निकल हेड जैनुद्दिन मुल्ला, सेल्स मॅनेजर इम्रान खान, मार्केटिंग मॅनेजर स्वप्नील देशमुख यांनी कंपनीच्या उत्पादनांची माहिती दिली. क्रॅक कव्हरेज, सोपा मेंटेनन्स, लीक प्रुफ, सिड व ब्राशन रेजिटन्स असे गुणविशेष असलेले उत्पादने सादर केली.

जैनुद्दिन मुल्ला आणि इम्रान खान यांनी अधिक माहिती सांगताना यामध्ये यु ३१३ वॉटर प्रूफ पावडर हे कॉंक्रिट मिक्स एकजीव होण्यासाठी, ड्युरेबलपणा वाढण्यास, भुंगिर प्रमाण कमी करण्यात, खर्चात बचत करण्यात, स्टील गंज थांबविणे यासाठी उपयुक्त आहे. यू ५१५ वॉटर प्रूफिंग आणि बॉंडिंग एजंट हे केमिकल वॉटर प्रूफ मटेरियल साठी, बॉंडिंग वाढवणे, डस्टिंग कमी करणे, मटेरिअलची ताकद वाढवणे, केमिकल रेजिस्ट साठी उपयुक्त आहे. यू ९१९ प्लास्टिक हे बाथ रूम टॉयलेट आणि संक स्लॅब चे वॉटर प्रूफ साठी वापरण्यास उत्तम असून हे सिड रेजीस्टंट, लिकेज प्रूफ, क्रॅक कव्हर करणारे परिणामकारक वॉटर प्रूफ मटेरियल आहे.

या सर्व उत्पादनांना आय एस आय मानांकन असून अतिशय स्वस्त दरात ही उत्पादने आपल्या मार्केट मध्ये उपलब्ध आहेत. तसेच या संबंधित विविध डेमो सभासदांसाठी सादर केले. हे प्रॉडक्ट वापरल्याने कॉंक्रिट मधील भूंगिर नाहीसे होऊन लिकेज नसणारे चांगल्या क्वालिटीचे कॉंक्रिट आपणास बनवता येते.

यावेळी बोलताना संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी या प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सभासदांना त्यांची खरी ओळख होते. तसेच वाजवी दरात ही उत्पादने उपलब्ध असल्याने खर्चात बचत होणे आणि बांधकामाचे आयुष्य वाढण्यास त्यांचा उपयोग होणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास भूषण पांडव, सुनील औटी, प्रदीप तांदळे, संतोष खांडेकर, जितेश सचदेव, अशोक मवाळ, सुरेंद्र धर्माधिकारी, पंकज जहागिरदार, सलीम शेख, विजय पादिर, सैफ शेख, दत्तात्रय गीते, राजेंद्र भगत, अन्वर शेख, नंदकिशोर घोडके, सचिन डागा आणि सभासद उपस्थित होते. संचालक यश शहा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सचिव अभिजित देवी यांनी आभार मानले.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

जाहीर नोटीस–०३/२०२४

तमाम लोकांना या जाहीर नोटीव्दारे कळविण्यात येते की, म.औ.वि.म. अहिल्यानगर औद्योगिक क्षेत्र ता. नगर, जि. अहिल्यानगर या औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र. बी–१०/२/१४ हे महाराष्ट्र विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून सदर भुखंडातील लहान मोठी झाडे काढण्यासाठी तसेच फांद्या छाटण्याकरिता वृक्ष अधिकारी म्हणून माझ्याकडे परवानगी मागितलेली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| नाव व भुखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष तोडीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| मे. सद्गुरू इंडस्ट्रिज, भुखंड क्र. बी–१०/२ /१४, अहिल्यानगर. | १९ | नवीन औद्योगिक इमारत उभारण्याकरिता | |

तरी कलम ११(२) Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of trees Act. १९७५ कलम ८ नुसार सदर झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या हरकती असल्यास तसे त्यांना आम्हांस ही नोटीस पोहचल्यापासून ८ दिवसाच्या आत खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. तसे कोणी न कळविल्यास मागणीप्रमाणे झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत मुख्यालय कार्यालयाची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, नंतर कोणाची कसली ही तक्रार चालणार नाही म्हणून जाहीर नोटीस दिली.

आयएफएमएस क्र./P-353722 /२०२४.
मऔदिम, स्थापत्य, उपविभाग,
उपअभियंता यांचे कार्यालय,
अहिल्यानगर.
दिनांक: २१/११/ २०२४.

**उपअभियंता तथा विशेष नियोजन प्राधिकारी,**
म.औ.वि.म., स्थापत्य उपविभाग, अहिल्यानगर
Tel. No. 0241-2777970
E-mail: deahilyanagar@midcindia. Org



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

जाहीर नोटीस–०१/२०२४

तमाम लोकांना या जाहीर नोटीव्दारे कळविण्यात येते की, म.औ.वि.म. अहिल्यानगर औद्योगिक क्षेत्र ता. नगर, जि. अहिल्यानगर या औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र. बी–१०/२/६ हे महाराष्ट्र विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून सदर भुखंडातील लहान मोठी झाडे काढण्यासाठी तसेच फांद्या छाटण्याकरिता वृक्ष अधिकारी म्हणून माझ्याकडे परवानगी मागितलेली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| नाव व भुखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष तोडीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| मे. रत्नप्रभा मोटर्स, भुखंड क्र. बी–१०/२ ६, अहिल्यानगर . | १२ | नवीन औद्योगिक इमारत उभारण्याकरिता | |

तरी कलम ११(२) Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of trees Act. १९७५ कलम ८ नुसार सदर झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या हरकती असल्यास तसे त्यांना आम्हांस ही नोटीस पोहचल्यापासून ८ दिवसाच्या आत खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. तसे कोणी न कळविल्यास मागणीप्रमाणे झाडे काढण्यासाठी अथवा फांद्या छाटण्याबाबत मुख्यालय कार्यालयाची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, नंतर कोणाची कसली ही तक्रार चालणार नाही म्हणून जाहीर नोटीस दिली.

आयएफएमएस क्र./P-353722 /२०२४.
मऔदिम, स्थापत्य, उपविभाग,
उपअभियंता यांचे कार्यालय,
अहिल्यानगर.
दिनांक: २१/११/ २०२४.

**उपअभियंता तथा विशेष नियोजन प्राधिकारी,**
म.औ.वि.म., स्थापत्य उपविभाग, अहिल्यानगर
Tel. No. 0241-2777970
E-mail: deahilyanagar@midcindia. Org


## श्रीकांत फिरोदिया यांच्या आयंबिल शतकपुर्ती तापसाधनेची पुर्णाहुती



नगर – श्रीकांत सुरजमल फिरोदिया यांच्या १०० व्या आयंबिल शतक तपसाधनेची १५ नोव्हेंबर रोजी पचकावणी संस्कार मंच प्रणेता, श्रमणसंघीय उपप्रवर्तक 'सिध्दराज' सिध्दार्थ मुनीजी म. सा. तथा डॉ. सौम्याश्रीजी म. सा. तीर्थश्रीजी म. सा., रिध्दीश्रीजी म. सा. यांच्या सान्निध्यात सावेडी धर्मस्थानकामध्ये पूर्णाहुती झाली.

या कार्यक्रमास मोठा जनसमुदाय उपस्थित होता. श्रीकांत फिरोदिया हे अहमदनगर मर्चंट्स को. ऑप. बँकेचे माजी शाखाधिकारी आहेत.


त्यांच्या धर्मपत्नी सौ. संगिता फिरोदिया यांनी १५ दिवसांची तपसाधना तसेच त्यांच्या दोन्ही कन्या सौ. मोनिका बोरा व कु. सोनम फिरोदिया दोघींनीही ९ उपवासाची तपश्चर्या करून कौटुंबिक सहभाग नोंदविला. चालू चातुर्मासामध्ये सलग तीन आयंबिल मासखमण पूर्ण करून आयंबिल शतकवीर होण्याचा बहुमान मिळविल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# धम्माल मनोरंजन

## मनोरंजक शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) हौद
२) लेख लिहिणारा
४) पाण्याचे वायुरुप
७) बारीक खड्यांचा समुदाय
८) धान्यांचा ढीग
९) करपलेला भाग
११) झाडू, फडा
१३) एक तृणधान्य
१४) क्रिकेटचा सहा
१५) वर्तृळाकार
१६) बुद्धिवान पुरुष, शहाणा
१७) अगस्ती ऋषीचे पिता
१९) हलवा २१) आजपर्यंत
२३) एक वाद्यप्रकार
२४) दुर्लक्ष, गई
२६) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२८) पाणी, आयुष्य
३०) गणपती ३२) जातीसंबंधी
३४) कलिंगड
३५) प्रतिबंध, आडकाठी
३७) कपाळ ३८) श्रीकृष्ण
४०) दारुकाम ४२) एक धान्य
४४) धोबी ४५) वा र म चा अक्षरबदल ४६) पंचमहाभूतांचे विशिष्ट मिश्रण ४७) एक टणक फळ ४८) श्री विष्णू
५२) सुटलेले केस ५३) शुल्क
५४) एक हिंदी चित्रपट



**उभे संकेत**

१) कपाळ, माया
२) लिहिण्याचे साधन
३) जाडसर खडे
४) अलगुज, पावा
५) विटीदांडूच्या खेळातील एक संज्ञा ६) एक राक्षस
८) गुपीत गोष्ट
१०) शिकार करणारा
१२) एक लवचिक वस्तु
१३) लहान शिवाजी
१७) प्रत्येक जन्मी
१८) रुपवान, देखणी
२०) सत्ता, कारकिर्द
२१) अग्नि
२२) विष्णूचे दोन द्वारपाल
२५) लोकनेता
२७) एक नशेल पदार्थ
२९) एक राक्षस
३१) यमदुत
३३) यमासारखा भयंकर मनुष्य
३६) नवरदेव नवरीच्या मधात धरावयाचा कापड
३९) लांब
४०) रातंबीची साल
४१) स्वारी, प्रवासी
४२) थडगे ४३) भयंकर उष्णता
४९) हल्ला
५०) गर्व (हिं.)
५१) वानर

## दिनविशेष २२नोव्हेंबर२०२४

१८०८: थॉमस कूक – पर्यटन व्यवस्थापक (मृत्यू: १८ जुलै १८९२)
१८६४: भारताची प्रथम महिला चिकित्सक रुक्माबाई यांचा जन्म झाला होता.
१८७७: एफ.सी. बार्सिलोनाचे संस्थापक जोन गॅम्पर यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९३०)
१८८०: केशव लक्ष्मण दफ्तरी – ज्योतिर्गणितज्ञ, संशोधक आणि बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत, वैदिक वाङ्मय, वेदान्त तत्त्वज्ञान आणि होमिओपाथी हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. अकरा उपनिषदांचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९५६)
१८८२: प्रसिध्द भारतीय उद्योजक वालचंद हिराचंद जन्म झाला होता.
१८८५: हिराबाई पेडणेकर – पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार (मृत्यू: १८ आक्टोबर १९५१)
१८९०: चार्ल्स द गॉल – फ्रेन्च राष्ट्राध्यक्ष आणि सेनापती (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९७०)
१८९९: भारतीय स्वतंत्रता सेनानी शहीद लक्ष्मण नायक यांचा जन्म झाला होता.
१९०९: द. शं. तथा 'दादासाहेब' पोतनीस – स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत, समाजसेवक आणि पत्रकार (मृत्यू: २७ ऑगस्ट १९९८)
१९१३: डॉ. लक्ष्मीकांत झा – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ञ, मुत्सद्दी, कुशल प्रशासक, रिझर्व बँकेचे गव्हर्नर, जम्मू काश्मीरचे राज्यपाल व भारताचे अमेरिकेतील राजदूत (मृत्यू: १६ जानेवारी १९८८ – पुणे)
१९१५: किशोर साहू – चित्रपट अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २२ ऑगस्ट १९८०)
१९१६: भारतीय स्वतंत्रता सेनानी शांती घोष यांचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.
१९२२: साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख यांचा जन्म.
१९२६: मेडएक्स कॉर्पोरेशनचे संस्थापक आर्थर जोन्स यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑगस्ट २००७)
१९३९: मुलायमसिंग यादव – उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, केंद्रीय संरक्षण मंत्री
१९४३: बिली जीन किंग – अमेरिकन लॉनटेनिस पटू
१९६७: बोरिस बेकर – ६ वेळा ग्रँड स्लॅम जिंकलेला जर्मन लॉनटेनिस पटू
१९६८: पीएचपी (झक्झ) प्रोग्रामिंग लँग्वेजचे निर्माते रासमुस लेर्दोर्फ यांचा जन्म.
१९७०: मार्वन अट्टापट्टू – श्रीलंकेचा क्रिकेट कर्णधार
१९८०: नेपस्टरचे संस्थापक शॉन फॅनिंग यांचा जन्म.

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१८८१: स्वतंत्रता सेनानी अहमदुल्लाह यांचा मृत्यू झाला होता.
१९०२: फ्रेडरिक क्रूप्प – जर्मन उद्योगपती (जन्म: १७ फेब्रुवारी १८५४)
१९२०: एकनाथ पांडुरंग रेंदाळकर – कवी व संपादक (जन्म: ? ? १८८७)
१९४४: खगोलशास्त्रज्ञ सर आर्थर एडिंग्टन यांचे निधन.
१९५७: पार्श्वनाथ आळतेकर – नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (जन्म: १४ सप्टेंबर १८९७)
१९६३: अल्डस हक्सले – इंग्लिश लेखक (जन्म: २६ जुलै १८९४)
१९६३: अमेरिकेचे ३५ वे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांची हत्या (जन्म: २९ मे १९१७)
१९८०: मे वेस्ट – हॉलिवूडमधील अभिनेत्री, गायिका, संवादलेखिका व सौंदर्यवती (जन्म: १७ ऑगस्ट १८९३)
२०००: डॉ. हरी जीवन तथा एच. जे. अर्णीकर – अणूरसायनशास्त्रज्ञ, प्राध्यापक (जन्म: ६ आक्टोबर १९१२?)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | का | शी | झे | प | घे | रे | पा | ख | रा | | अ | सा |
| प | द | र | प | स | र | णे | | टा | | ज | मा | त |
| म | र | | | र | | | वि | रा | ज | मा | न | |
| त | | क | प | ट | ना | ट | क | | न | | त | ह |
| ल | स | | व्ह | | क | म | त | र | ता | | | ल |
| बी | ज | ग | णि | त | | का | | | ज | | न | ग |
| | वि | | | रा | ग | | स | प | ना | मु | ख | र्जी |
| ग | णे | श | मं | ड | ळ | | | | र्द | | रा | प |
| ळू | | नि | च | | | ता | य | वा | न | | | णा |
| | | प्र | | आं | स | | म | | | | भ | |
| ह | म | दो | नो | दो | प्रे | मी | दु | नि | या | छो | ड | |
| म | | ष | | ल | म | | त | य | | क | वा | ल |
| ला | ख | | दो | न | | | | म | दा | री | | क्ष |

### फळे व आरोग्य

**दुधी**

**उष्णतेचे विकार आणि दुधी**

अतिवाचनाने व अतिजागरणाने डोळे लाल होतात, वेल्डिंग लागूनही डोळे लाल होतात व खुपतात. अशा वेळी दुधी किसून त्याचा कीस डोक्यावर बांधल्यास सर्व लक्षणे दूर होऊन डोळे पूर्ववत होतात. असे आहेत दुधीचे औषधी उपयोग! जो करेल तो त्याचा लाभ घेईल दुधी अल्पमोली आहे पण तितकाच श्रेष्ठगुणी आहे. म्हणून यापुढे दुधी व भाजीकडे केवळ भाजी म्हणून पाहू नका. औषध म्हणून पहा घरात दुधी हलवा करा, दुध्याची खीर का दुधी खाण्यात लाज नाही. देहस्वास्थ्य सुधारण्यात गौरवच आहे. स्वतःचे आरोग्य सुधारा!

### म्हणी व अर्थ

**एक कोल्हा सतरा ठिकाणी व्याला.**

**अर्थः** अर्थ एका व्यक्तीपासून अनेक ठिकाणी उपद्रव्य होणे.

### रुचिदा

## नूडल्स धिरडे



**साहित्य :** १ कप उकडलेली नूडल्स, दीड कप मैदा, एक लहान चमचा मीठ, अर्धा चमचा काळेमिरे पूड, दोन चीज क्यूब्स, तळण्यासाठी तेल, दूध आवश्यकतेनुसार, सुक्या लाल मिरच्या.

**कृती :** सर्वप्रथम मिक्सरमध्ये मैदा, मीठ व काळे मिरे पूड घालून नंतर त्यात दूध घालून मिश्रणाला एकजीव करावे. आता नॉनस्टिक पॅन गरम करून त्यावर थोडेसे उकडलेले नूडल्स ठेवावे त्यावर एक चमचा तयार मिश्रण घालून चांगले पसरवून घ्यावे. वरून चीज व लाल मिरच्याचे तुकडे घालून गुलाबी होईस्तोर दोन्ही बाजून परतून घ्यावे. सर्व्ह करताना सॉस व चटणी घालून सर्व्ह करावे.



## मनोरंजक शब्दकोडे



**आडवे संकेत**

१) जादुटोणा, एक वेधशाळा ६) रागाचा आवेग ९) हत्ती, घोडे, नोकर–चाकर इ.
१०) नटात श्रेष्ठ, परमेश्वर११) इच्छा, वासना १२) लुच्चा, लफडेबाज
१५) जिन्नस, वस्तू
१६) कौशल्याची कामे
१८) अतिशय गर्दी
२१) रानटी कबुतर
२२) सुक्ष्म दृष्टी, बारीकपणा
२३) जास्त भाजले जाणे २४) खेप, पाळी, एक जात
२५) रजनी
२७) सकाळची वेळ
३०) स्तुती, प्रशंसा
३१) मित्र, सखा (हिं.)

**उभे संकेत**

२) फार बारीक व मऊ
३) निघालेला, मार्गस्थ
४) मोहोर, तुरा, री ५) चापटेचा प्रहार ६) कपाळावर लिहिणारी ७) देवाजवळ प्रार्थना करणे, कबूल करणे
८) हस्त १०) मादक, अंमली
११) भांबावलेल्या चेहऱ्याचा, विद्रुप
१३) विष्णूभार्या
१४) तपास, पत्ता
१७) वर्णन करणाराने ते खुलविण्यासाठी पदरचे घातलेले तिखटमीठ
१९) पिकांना वाळवून टाकणारी एक कीड
२०) आडव्या उभ्या रेषांचा स्तंभ
२१) मंगळ, शनी इ. अशुभ मानलेले ग्रह.
२३) एक मुसलमानी नाव
२४) एक संख्या
२६) त्रासलेला
२८) लोक, रयत
२९) किंमत, योग्यता, गुण

### मागील उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कौ | र | व | | मं | दा | र | मा | ला | |
| ल | | री | वा | ज | | स | ह | वा | स |
| प्र | वा | स | | न | क्ष | र | | | ह |
| सा | र | | भा | | क | स | र | त | |
| दे | व | डा | द | व | डी | | ड | ब | के |
| | धु | ळ | व | ड | | भा | वि | क | |
| पा | | | ड | ग | म | ग | णे | | क |
| च | ला | ख | | ण | | व | | पा | व |
| क | ला | ग | त | | अं | त | र | पा | ट |

### विनोद

एकदा नारायणराव हॉटेलात इडली सांबार खायला गेले. तो त्यांच्या सांबारमध्ये सापडलेले बटन पाहून नारायणराव चांगलेच भडकले. त्यांनी वेटरला ओरडून बोलावले आणि त्याच्यापुढे बटन भिरकावून देत म्हटले, हे काय आहे पाहलंस? थँक्यू व्हेरी मच सर वेटर ते उचलून घेत म्हणाला, माझ्याच पँटचं आहे ते.

### मागील फिल्मी कोड्याचे उत्तर


| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | मा | री | ब | हु | अ | ल | का | | | खे | ल | ते |
| म | | ना | | | | ड | | सि | | ल | व | |
| सा | य | रा | बा | नो | | कि | स्म | त | का | खे | ल | |
| थ | | य | | | आ | प | | म | | ल | व | के |
| सा | थी | | घा | त | | सं | जो | ग | | मे | ल | |
| थ | | श | | नु | | द | | र | | | व | ह |
| है | री | बा | वे | जा | | है | | | चां | दी | | म |
| | | ना | | | ये | | जा | | द | | टे | |
| ह | म | आ | प | के | है | कौ | न | | का | | ली | |
| व | | ज | | | ज | | व | न | टु | का | फो | र |
| स | ला | मी | | दि | ल | ब | र | | क | | न | |
| | | | | दा | वा | | | ल | डा | ई | | |
| चो | र | पे | मो | र | | सु | नी | ता | | ना | रा | ज |

## फिल्मी शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) सन् २००१ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में रानी मुखर्जी और सलमान खान थे. ६) हम किसीसे नही (फिल्म)
८) पल दिल के पास तुम रहती हो.... (गीत) ९) इस फिल्म में नसिरुद्दीन शाह, धर्मेंद्र और सोनु वालिया थे.
१०) जानेमन पलट तेरी नजर... (गीत)
११) आमिर खान और मनिषा कोईराला अभिनीत एक फिल्म.
१२) निर्माता, निर्देशक विधु विनोद चोपडा की इस फिल्म में माधूरी दीक्षीत और अनिल कपूर थे. १६) सन् १९८५ में बी.एस. गिलाड के निर्देशन में बनी इस फिल्म में राजेश खन्ना और रिना रॉय थे.
१९) डेविड धवन निर्देशित इस फिल्म में गोविंदा और दिव्या भारती थे.
२२) यहा अर्थ की आवश्यकता नही.
२३) इन शिमला (फिल्म)
२५) इस फिल्म में जितेंद्र और मौसमी चटर्जी थे.
२७) पन्ना (फिल्म)
२९) ऋषी कपूर और डिम्पल कपाडिया अभिनीत एक फिल्म.
३१) दुल्हन एक की (फिल्म)
३३) इस फिल्म में फैजल खान और अंजली जव्हार थे.
३५) नरेश कुमार निर्देशित इस फिल्म में राजेंद्र कुमार और वैजयंती माला थे.
३७) इस फिल्म में अनिल कपूर और अमृता सिंह थे. ४०) बदन (फिल्म)
४१) इस फिल्म में अनिल कपूर की सांस हेमा मालिनी थी. ४३) मुराद (अभिनेता)
४४) राज कंवर निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और ट्विंकल खन्ना थे.
४५) कौशिक (अभिनेता)
४६) की अदालत (फिल्म)





**उभे संकेत**

१) सन् १९७४ में अशोक रॉय निर्देशित इस फिल्म में शशी कपूर और मुमताज थे.
२) अजय देवगन और रानी मुखर्जी अभिनीत एक फिल्म. ३) खडे हो जरुर कोई बात है ये पहली.... (गीत) ४) दो पल का ये सफर पल दो पल का साथ... (गीत) ५) मेहता (निर्माता)
६) कागज दवात का.... (गीत)
७) रोटी, कपडा और (फिल्म)
१०) छलके आंखो से शराब और भि .... (गीत)
१३) तेरे कितने नाम (फिल्म)
१४) निर्देशक यश चोपडा की इस फिल्म में शाहरुख खान और जुही चावला थे.
१५) हासन (अभिनेता)
१६) साथ साथ घटा के संग.... (गीत)
१७) ने किया था प्यार मगर मुझे.... (गीत)
१८) सन् १९८३ में राजकुमार कोहली निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र और रीना रॉय थे.
२०) सन् १९९७ में राहुल रवैल निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल और ऐश्वर्या रॉय थे.
२१) रामानंद सागर ने बनाई इस फिल्म में धर्मेंद्र और रीना रॉय थे.
२४) महान इस फिल्म की एक अभिनेत्री.
२६) प्यार तुम्हारा मैने बांध लिया आंचल मै....(गीत) २८) यहा अर्थ की आवश्यकता नही.
३०) सन् १९९६ में बनी इस फिल्म में सलमान खान और मनिषा कोईराला थे.
३४) बा श का अक्षरबदल.
३६) मेरे दो अनमोल (फिल्म)
३७) संजय दत्त, सलमान, माधूरी दीक्षीत अभिनीत फिल्म. ३८) यहा अर्थ की आवश्यकता नही.
३९) हृत्विक रोशन की पत्नी.
४२) आपके प्यार में हम संवरने लगे.... यह गाना इस फिल्म का है.




आदर्श मतदान केंद्राची उभारणीसह मतदारांसाठी महापालिकेने उपलब्ध केलेल्या सुविधांमुळे यंदा नगर शहरातील मताच्या टक्केवारीत वाढ झाली.

# अहिल्यानगर शहरात मतदानाचा टक्का वाढल्याने महानगरपालिकेचे जनजागृती अभियान यशस्वी

## आदर्श मतदान केंद्राची उभारणी; मतदारांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधांमुळे मतदारांकडून समाधान व्यक्त

नगर – अहिल्यानगर शहरातील मतदारांमध्ये जनजागृतीसाठी महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. अहमदनगर विधानसभा मतदारसंघात मागील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढला आहे. तसेच, महानगरपालिकेमार्फत झालेली आदर्श मतदान केंद्रांची उभारणी, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हील चेअर, पाणी व इतर सुविधांमुळे मतदारांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत अहिल्यानगर शहरात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती अभियान राबविण्यात आले. शहरातील विविध घटकातील नागरिक, संघटना, दिव्यांग बांधव, तृतीयपंथी आदींमध्ये जनजागृती करून शंभर टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली. महानगरपालिकेच्या बस सेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेण्यात आले. महानगरपालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती करण्यात आली. बाईक रॅलीद्वारे संपूर्ण शहरात मतदान करण्याचा संदेश देण्यात आला.

तसेच, अहिल्यानगर शहरातील मतदारांना मध्ये मतदान केंद्र, यादीतील क्रमांक, खोली आदीची अचूक माहिती मिळावी, अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे मतदार स्लिप वितरण करण्यात आले. शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, क्रमांक ४, रेल्वे स्टेशन समोर आणि महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालय, सावेडी या दोन ठिकाणी मतदान केंद्रांवर सजावट करण्यात आली. मतदारांसाठी मंडप, शोभिवंत झाडांच्या कुंड्या, फुग्यांची सजावट करण्यात आली. मतदान जागृतीचे फलक व सेल्फी पॉइंट लावण्यात आले. आयुक्त यशवंत डांगे यांनी मतदारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शहरातील सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांग बांधवांसाठी व्हील चेअरची व्यवस्था, हिरकणी कक्ष, तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. गेल्या दोन दिवसात मतदान केंद्रांची स्वच्छता करण्यात आली. तसेच, स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्यात आली.

शहरात रस्त्यांची कामे सुरू असल्याने मतदान केंद्रापर्यंत पोहचण्यात अडथळा येऊ नये, यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः पाहणी करून मतदान केंद्र असलेल्या परिसरातील कामे मतदानाच्या दिवसापूर्वी पूर्ण करून घेतली. जिथे कामे प्रगतीपथावर होती, तेथे उपाययोजना करण्यात आल्या. त्यामुळे मतदारांची गैरसोय टळली व मतदान वाढीवर चांगला परिणाम झाला. अहमदनगर मतदारसंघात मागील निवडणुकीत ५८.२८ टक्के मतदान झाले होते. यंदा त्यात वाढ होऊन ६३ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे. नागरीक, मतदारांनी महानगरपालिकेच्या प्रयत्नांना साथ देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल आयुक्त यशवंत डांगे यांनी मतदारांचे आभार मानले आहेत.

# आ. मोनिकाताई राजळे यांच्यावर पाथर्डीच्या शिरसाठवाडीत दगडफेक

## बचावासाठी कार्यकर्त्यांसह घेतला मतदान केंद्राच्या खोलीचा आश्रय



आ. मोनिका राजळे यांच्यावर शिरसाठवाडी मतदान केंद्रावर दगडफेक झाल्याच्या निषेधार्थ पाथर्डीत माणिकदौंडी चौकात रास्ता रोको करताना राजळे समर्थक.

पाथर्डी–शेवगाव–पाथर्डी मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार आ. मोनिका राजळे यांच्यावर दगडफेक करण्यात आल्याचा प्रकार बुधवारी (दि.२०) सायंकाळी तालुक्यातील शिरसाठवाडी येथील मतदान केंद्रावर झाला. यावेळी आक्रमक जमावापासून बचाव व्हावा, म्हणून राजळे यांनी कार्यकर्त्यांसह मतदान केंद्राच्या खोलीत आश्रय घेतला. उपविभागीय अधिकारी सुनील पाटील यांनी मोठा पोलीस बंदोबस्त घेत दोन तास मतदान केंद्रात बसून असलेल्या राजळे यांची सुटका केली.

आ.राजळे या शिरसाठवाडी मतदान केंद्रावर वाद सुरू असल्याचे समजल्यावर त्या ठिकाणी गेल्या असता, तेथे शेकडो युवक जमा झाले व त्यांनी राजळे यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली. पोलिसांनी या तरुणांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस दल अपुरे असल्याने उपयोग झाला नाही. यानंतर राजळे यांच्या दिशेने दगडफेक करण्यात आली. ती चालू असतानाच आ.राजळे यांना त्यांच्या कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राच्या खोलीत नेले. यावेळी मतदानप्रक्रिया संपलेली होती. जवळपास एक तास वीज गायब झाल्याने राजळे यांना काही काळ अंधारात बसावे लागले. दरम्यान पाटील व पोलीस निरिक्षक संतोष मुटकुळे हे शिरसाठवाडी येथे मोठा पोलीस बंदोबस्त घेऊन आले व त्यांनी मतदान केंद्राजवळ जमा झालेल्या तरुणांना हुसकावून लावले आणि आ. राजळे यांना पाथर्डीत नेवून सोडले.

दरम्यान या घटनेची माहिती कळताच राजळे यांचे हजारो समर्थक माणिकदौंडी चौकात जमा झाले व त्यांनी दगडफेक करणाऱ्या तरूणावर तातडीने गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा, अशी मागणी करत रास्ता रोको आंदोलन सुरू केले होते.

### गुन्हा दाखल करण्यास आ.राजळे यांचा नकार

याप्रकरणी राजळे यांनी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्याने या संदर्भात रात्री उशिरापर्यंत कोणत्याही गुन्ह्याची नोंद पोलीस स्टेशनला करण्यात आली नाही. यावेळी प्रतिक्रिया देताना आ.राजळे म्हणाल्या, माझं शरीर जखमी झालं तरी हरकत नाही, पण या मुलांचं भविष्य उद्ध्वस्त होता कामा नये. तरूण मुलं चुकू शकतात, पण त्यांचे भवितव्य उद्ध्वस्त होऊ नये, यासाठी आपण तक्रार देणार नसल्याचे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना शांततेचे आवाहन केले.

# नगरसह राज्यात थंडीचा कडाका वाढला, तापमानात मोठी घट

पुणे – महाराष्ट्रात तापमानात चढ–उतार सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी राज्यातही पावसाची शक्यता होती. अशा स्थितीत आता हळूहळू तापमानात घट होत असल्याचे दिसून येत आहे. पाऊस गेल्यानंतर राज्यात कडाक्याची थंडी पडली असून त्यामुळे रात्रीच्या वेळी गारठा अधिक जाणवत आहे. उत्तर महाराष्ट्रात सध्या कमालीची थंडी आहे. नाशिक, निफाड, धुळे या शहरांमध्ये कमाल आणि किमान तापमानात मोठी घट झाली आहे. नगर मध्ये ही किमान तापमान १४.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. यासोबतच येत्या काही दिवसांत संपूर्ण राज्यात थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात ढगाळ वातावरण राहिल्यानंतर आता आकाश थोडे निरभ्र दिसत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात किमान तापमानात मोठी घसरण होत आहे. येथील तापमान १५ अंशांच्या खाली गेले आहे. दरम्यान, आज राज्यातील किमान तापमानात घट होऊन थंडीत हळूहळू वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

हिंद महासागर, मालदीव आणि विषुववृत्ताजवळ चक्रीवादळाची स्थिती निर्माण होत आहे. याशिवाय, आग्नेय अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असल्याचे दिसून येत आहे. येत्या काही दिवसांत राज्याच्या किमान आणि कमाल तापमानात झपाट्याने घट होईल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

धुळ्यात १२.६ अंश किमान तापमानाची नोंद झाली. तर जळगाव, परभणी, गडचिरोली, गोंदिया, ब्रह्मपुरी, नागपूर, अमरावती येथे किमान तापमान १५ अंशांपेक्षा कमी नोंदवले गेले आहे. याशिवाय उर्वरित राज्यातील किमान तापमानातही घट दिसून येत आहे.



# रेणुका रेसिडेन्सी मधील नागरिकांचे १०० टक्के मतदान

नगर – विधानसभा निवडणुकीत रेणुका रेसिडेन्सी मधील रहिवाशांनी एकत्रित येऊन मतदान केले. याप्रसंगी जेष्ठ सदस्यांचा सत्कार करण्यात आला. शहरात प्रथमच अशाप्रकारे एकत्रित येऊन मतदान करून मतदानाचा हक्क बजावला. आपली कॉलनी टीव्ही सिरीयल मधील गोकुळधाम सोसायटीसारखी व्हावी. सर्वांचे एकमेकांमधील आदर, प्रेम, सहकार्य वाढत जावो. आजच्या कार्यक्रमा प्रमाणेच वर्षातून एकदा तरी असा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# स्वीप उपक्रमांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रेरणादायी

## उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील यांचे प्रतिपादन

नगर – महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीने मतदान जनजागृतीसाठी माहिती तंत्रज्ञान व संप्रेषण या घटकांचा आधार घेत स्वीप उपक्रमांना वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. काळाप्रमाणे बदलत मतदार तंत्रस्नेही होत असताना आपल्यासमोर येणाऱ्या कालावधीमध्ये निश्चितच तंत्रज्ञानाचे विविध प्रकार आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशांनुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी) यांच्या संकल्पनेतून सोशल मीडियावरील विविध पोस्ट शेअर करण्यासाठी स्वीप समितीने तयार केलेल्या विविध हॅशटॅगच्या विमोचनप्रसंगी श्री. पाटील बोलत होते. यावेळी प्रवीण महाजन (अपर जिल्हाधिकारी),गजानन नकासकर (जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी), विनोद सगरे (प्रादेशिक परिवहन अधिकारी) उपस्थित होते.

हॅशटॅग म्हणजे  या चिन्हाला जोडून लिहिलेले शब्द होय. हॅशटॅग लावून एखाद्या विषयाला ठळक करण्यासाठी वापरले जाते. एखाद्या शब्दाला हॅशटॅग लावल्यामुळे त्याची एक लिंक तयार होते आणि अशा शब्दाला जर आपण क्लिक केले तर तो शब्द इंटरनेटवर जिथे–जिथे उपलब्ध आहे त्या–त्या ठिकाणी त्या संदर्भातल्या पोस्ट व व्हिडिओज इत्यादी साहित्य फेसबुक, ट्विटर, टमलर, युट्युब आपल्याला एका दृष्टिक्षेपात दिसायला लागतात.स्वीप समितीचे शेकडो उपक्रम गेल्या तीन महिन्यांपासू जिल्ह्यात चालू आहेत. प्रत्येक जण आपापल्या सोशल मीडियावर स्वतः केलेले उपक्रम टाकत असतो. परंतु सर्वच उपक्रम स्वीप समिती पर्यंत येत नाहीत.



स्वीप समितीने तयार केलेल्या विविध हॅशटॅगच्या विमोचन करताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील. समवेत अधिकारी.

## sveepahilyanagar यांसह विविध हॅशटॅगचे विमोचन

सर्वांनी उपक्रमांना sveepahmednagar असा हॅशटॅग लावून सोशल मीडियावर अपलोड केल्यास या हॅशटॅगने जिल्ह्यातीलच नव्हे जगातील सर्व उपक्रम एकाच वेळी इंटरनेटवर सापडल्याने वरिष्ठांकडे उपक्रमाचा अहवाल पाठवणे तसेच मतदार जनजागृतीची व्याप्ती वाढवणे सोपे जाते. मतदान केलेल्या मतदारांनी आपल्या वोट सेल्फी खालील विविध हॅशटॅगसह सोशल मीडियावर अपलोड करावेत, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी– महाराष्ट्र यांचे देखील हॅशटॅग स्वीप समितीच्या विविध उपक्रमांना वापरण्यात आलेले आहेत. गुगल –मायक्रोसॉफ्ट –ॲपल तसेच युनेस्को डिजिटल टीचर डॉ.अमोल बागुल यांनी हे विविध हॅशटॅग तयार केले आहेत.हॅशटॅग पुढीलप्रमाणे– मतदारजनजागृती जागरलोकशाहीचा deoahilyanagar sveepahilyanagar विधानसभा निवडणूक २०२४ I Vote For Sure Saksham App Inclusive Elections Accessible Elections Chunav Ka Parv Desh Ka Garv Youth Votes ahahilyanagar eci maharashtra ceomahrashtra Sveep voter awareness voter registration voter helpline India no voter to be left behind मी नक्कीच मतदान करणार उत्सव निवडणुकीचा अभिमान महाराष्ट्राचा Election 2024 votingpower KYC sachintendulkar मतदान करा महाराष्ट्र Maharahstra Election 2024 DoVoteMaharashtra

उपक्रमासाठी बाळासाहेब बुगे (शिक्षणाधिकारी – योजना), मीना शिवगुंडे (उपशिक्षणाधिकारी), आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी), जयश्री कारले (विस्तार अधिकारी) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे .

# शेअर बाजारात भूकंप; सेन्सेक्स, निफ्टी निर्देशांक धडाधड कोसळले

## अदानी ग्रुपच्या शेअर्सना झटका, काही सेकंदातच कोट्यवधी बुडले

मुंबई – भारतीय शेअर बाजारात चढ–उताराचा खेळ सुरूच आहे. अलीकडच्या तेजीनंतर देशांतर्गत बाजारात पुन्हा एकदा मोठी घसरण पाहायला मिळाली आणि मार्केट उघडताच सेन्सेक्स, निफ्टी निर्देशांक धडाधड कोसळले. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा सेन्सेक्स लाल रंगात उघडला आणि काही मिनिटांतच ६०० पेक्षा अधिक अंकांनी घसरून ७६,९०६.४९ वर आला. यासोबतच राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२२.४६ अंकांनी घसरून २३,३०४.६० वर आला आहे.

या दरम्यान, भारतीय अब्जाधीश गौतम अदानींच्या शेअर्समध्ये मोठी पडझड झाली असून समूहाची सर्व सूचिबद्ध स्टॉक्समध्ये अमेरिकेतून आलेल्या एका मोठ्या बातमीनंतर विक्रीचा दबाव वाढला ज्यामध्ये अब्जाधीश गौतम अदानींवर मोठे आरोप करण्यात आले आहेत.

### अदानी समूहाचे शेअर्स जोरदार आपटले

अदानी समूहाचे अध्यक्ष आणि देशातील दुसरे सर्वात धनाढ्य उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेतील लाचखोरी व फसवणुकीच्या आरोपांमुळे अदानी समूहाचे सूचीबद्ध शेअर्स भारतीय शेअर बाजारात तोंडघशी पडले आहेत. अदानी समूहाच्या शेअर्समध्ये २० टक्के पर्यंत पडझड होत असून अदानी एनर्जीचे समभाग २० टक्के घसरणीसह उघडले तर समूहाची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्रायझेसचे समभाग १० टक्के घसरून २,५३९ रुपयांवर आले आणि शेअर लोअर सर्किटला लागला आहे. त्याचवेळी, अदानी पोर्ट्समध्ये १० टक्के, अंबुजा सिमेंटमध्ये १० टक्के आणि अदानी पॉवरमध्ये १६ टक्के घट दिसून आली आहे.

### सोलर कॉन्ट्रॅक्टसाठी करोडोंची लाच

गौतम अदानी आणि इतर सात जणांविरुद्ध अमेरिकेत गुन्हा दाखल झाल्यानंतर अदानी समूहाच्या सूचिबद्ध शेअर्समध्ये विक्रीचा दबाव वाढला. न्यूयॉर्क फेडरल कोर्टाने गौतम अदानी यांना सौर करारासाठी कोट्यवधी रुपयांची लाच आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांची दिशाभूल केल्याच्या आरोपाखाली अटक वॉरंट जारी केले आहे. या आरोपांनंतर, अदानी एंटरप्रायझेसने बाँडद्वारे ६०० दशलक्ष डॉलर्स उभारण्याची योजना रद्द केली आहे. याशिवाय अदानी बाँडची किंमतही सुमारे २० टक्के आपटली आहे. एफआयआयची विक्री, कंपन्यांचे अपेक्षेपेक्षा कमकुवत तिमाही निकाल आणि मजबूत यूएस बॉन्ड उत्पन्न यामुळे बाजारावर दबाव वाढत असल्याचे बाजार तज्ज्ञांचे मत आहे.

# ‘एग्जिट पोल’ म्हणजे निकालापूर्वीचे मनोरंजन !

राज्याच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या आणि तासाभरात राज्यातील समस्त वृत्तवाहिन्यांनी एग्जिट पोलचा निकष दाखवण्यास सुरुवात केली. मागील काही वर्षांपासून निवडणुकानंतर एग्जिट पोलचे निकाल दाखवण्याची प्रथा भारतात जोर धरू लागली आहे. कोणत्यातरी संस्थांच्या मार्फत हे एग्जिट पोल आखले जातात आणि वृत्तवाहिन्यांशी संगनमत करून ते लोकांसमोर ठेवले जातात. हें एग्जिट पोल वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावर दाखवताना स्टुडिओमध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी प्रमुख पक्षांच्या प्रतिनिधींना, राजकीय विश्लेषकांना निमंत्रित केले जाते. एग्जिट पोलने दाखवलेल्या आकडेवारीच्या अनुषंगाने एखाद्या क्षेत्रातील पक्षाची घसरण अथवा प्रगतीच्या अनुरूप पक्षाच्या प्रतिनिधिला प्रश्न विचारले जातात आणि त्यातून आम्ही दाखवलेला एग्जिट पोल कसा खरा आहे हे त्यांच्याकडून वदवण्याचा प्रयत्न केला जातो: मात्र या प्रयत्नांना यश कधीच येत नाही. प्रत्येक पक्षाच्या प्रतिनिधीची उत्तरे ठराविक आणि एकसारखीच असतात ती म्हणजे ’खरे काय ते निकालाच्या दिवशीच कळेल’ ’राज्याच्या विकासासाठी यावेळेस जनतेने आम्हालाच मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे’ ’आम्हालाच स्पष्ट बहुमत मिळून राज्यात आमचेच सरकार बनेल’. मुलाखतकाराने कितीही उलट सुलट प्रश्न विचारले तरी या मंडळींच्या उत्तरांमध्ये मात्र फारसा फरक पडत नाही. वृत्तवाहिन्यांवरील एकूणच माहोल पाहता एग्जिट पोलचा दिवस म्हणजे वृत्तनिवेदकांची, संपादकांची आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची जणू रंगीत तालीम असते. लाखो रुपये व्यय करून मांडण्यात येणारे हें एग्जिट पोल वेगवेगळ्या वाहिन्यांवर थोड्याबहुत फरकाने वेगवेगळे असतील याची विशेष दक्षता घेतली जाते. यापूर्वीच्या निवडणुकापूर्वी मांडण्यात आलेले एग्जिट पोलचे अंदाज आणि प्रत्यक्षात निवडणुकांतील आकडेवारी यामध्ये मोठी तफावत येत असल्याचे लक्षात आले आहे त्यामुळे यंदासुद्धा एग्जिट पोल्सने मांडलेल्या निकालाच्या अंदाजांना निकालापूर्वीच्या मनोरंजनाव्यतिरिक्त फारशी किंमत आहे असे वाटत नाही.



निमगाव वाघा (ता.नगर) मध्ये कर्नल रविंद्रन बिजॉय यांनी शहीद जवान गोरख जाधव यांच्या स्मारसकास अभिवादन करताना. समवेत पै.नाना डोंगरे आदी.

# निमगाव वाघात कर्नल रविंद्रन बिजॉय यांची भेट

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकास एमआयसीएसचे कर्नल रविंद्रन बिजॉय यांनी भेट देऊन शहीद जवान जाधव यांच्या स्मृतीस अभिवादन केले. यावेळी एमआयसीएसचे कर्नल राम मोहेन, कर्नल मोहंमद रफीक, डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, नगरचे गाईड अमोल बास्कर, मेजर ओबेरॉय, कर्नल एम.के. सिंग, मच्छिंद्र जाधव, सेवानिवृत्त मेजर शिवाजी पुंड आदींसह युवक–युवती उपस्थित होते.

एमआयसीएसचे कर्नल रविंद्रन बिजॉय यांच्यासह आलेल्या टिमचे निमगाव वाघा ग्रामस्थांच्या वतीने पै. नाना डोंगरे यांनी स्वागत केले. देश रक्षणाची कार्य करताना नक्षलवादींच्या हल्ल्यात शहीद झालेले जाधव यांच्या पराक्रमाची माहिती यावेळी देण्यात आली.

कर्नल रविंद्रन बिजॉय यांनी गावागावात देशभक्तीने भारावलेले युवक देश सेवेसाठी सैन्यात दाखल होतात. गावातून देशभक्तीचे बीजे पेरली जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी शहीद जवान गोरख जाधव अमर रहे! च्या घोषणा देण्यात आल्या.

